POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३२२ ● मुंबई, बुधवार, २४ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

तुकाराम मुंढे यांचा दणका, नागपुरात बोगस डॉक्टरचा भंडाफोड

पुण्यात नामांकीत कॉस्मेटिक ब्रँडचे बनावट उत्पादन

अन्न आणि औषध प्रशासनाकडून पुणे आणि नागपुरात मोठी कारवाई करण्यात आली आहे.
नागपुरात तर बोगस डॉक्टरचा भंडाफोड करण्यात आला आहे. तर पुण्यात नामांकीत कॉस्मेटिक कंपनीचे बनावट उत्पादन आढळले आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

महाराष्ट्राचे अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा धडाका सुरुच आहे. विशेष म्हणजे नागपुरात एका बोगस डॉक्टरचा भंडाफोड झाला आहे. त्याच्याकडे 1 लाखांचे औषध जप्त करण्यात आले आहे. तर पुण्यात नामांकित Cosmetic बॅन्ड Cetaphil चे बनावट उत्पादन जप्त करण्यात आलं आहे. तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार, अधिकाऱ्यांनी केलेल्या या कामाचे कौतुक होत आहे. या दोन्ही कारवायांची माहिती अन्न आणि औषध प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नागरिकांना उच्च गुणवत्तेची, सुरक्षित औषधे आणि सौंदर्यप्रसाधने मिळावीत यासाठी अन्न व औषध प्रशासन दक्षता बाळगत आहे. बेकायदेशीर औषध विक्री, बनावट औषधे आणि दिशाभूल करणाऱ्या औषधे व सौंदर्यप्रसाधने उत्पादनांविरुद्ध कठोर कारवाई केली जात आहे. त्याच अनुषंगाने अन्न-औषध प्रशासनाकडून नागपूर आणि पुणे येथे करण्यात आलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये गंभीर स्वरूपाचे उल्लंघन उघडकीस आले आहे.

नागपुरात बोगस डॉक्टरचा पर्दाफाश

22 जूनला नागपूर जिल्ह्यातील कोथुळना, ता. सावनेर, येथे बोगस डॉक्टरद्वारे संचालित प्राथमिक सामुदायिक इलेक्ट्रो होमिओपॅथिक उपचार केंद्रामध्ये विना परवाना औषध विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारावर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने सदर केंद्राची तपासणी केली. तपासणीदरम्यान संबंधित ठिकाणी विना परवाना मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथिक औषधसाठा आढळून आला. केंद्राचे मालक तथा बोगस डॉक्टर मोनिदीप सरकार यांच्याकडे औषधांच्या खरेदीची कागदपत्रे मागविण्यात आली असता त्यांनी कोणतीही खरेदी बिले सादर केली नाहीत. तसेच वैध औषध विक्री परवाना नसताना विक्रीसाठी औषधांची खरेदी, साठवणूक आणि विक्री केल्याचे निदर्शनास आले.

लाखाचा औषधसाठा जप्त

या प्रकरणी औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, 1940 मधील कलम 18(सी), 18अ तसेच नियम, 1945 मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्याने 1,07,000 रुपये किमतीचा औषधसाठा जप्त करण्यात आला आहे. जप्त औषधांमध्ये प्रामुख्याने Antibiotics, Antifungal, Injections आणि Multivitamins यांचा समावेश आहे.

पुण्यात काय कारवाई करण्यात आली ?

गोपनीय माहितीच्या आधारे अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे कार्यालयाने सौंदर्यप्रसाधनांची तपासणी केली असता, Cetaphil या प्रसिद्ध ब्रँडचे Cetaphil Gentle Skin Cleanser (118 एमएल), बॅच क्रमांक B5NA1110, हे सौंदर्यप्रसाधने मूळ उत्पादक आणि विपणनकर्ता कंपन्यांनी केलेल्या पडताळणीत सदर उत्पादन त्यांच्या अधिकृत उत्पादन प्रक्रियेतून तयार झालेले नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे हे उत्पादन "स्प्युरियस कॉस्मेटिक" (बनावट सौंदर्यप्रसाधन) असल्याचे निश्चित करण्यात आले.



या निष्कर्षांच्या आधारे दिनांक 22 जूनला पुण्यातील शिवाजीनगर परिसरातील मे. ओम केमिस्ट या विक्रेत्याकडून सदर बनावट सौंदर्यप्रसाधनाचा एकूण 5,508 रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, 1940 मधील तरतुदींनुसार करण्यात आली. तपासादरम्यान उपलब्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे पुण्याच्या चतुःशृंगी पोलीस स्टेशन येथे 22 ऑक्टोबर रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता, 2023 मधील कलम 318(4), 336 (3) आणि 340 (2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या दोन्ही कारवायांवर प्रतिक्रिया दिली आहे. "नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि विश्वासार्ह औषधे व सौंदर्यप्रसाधने उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. बनावट किंवा बेकायदेशीर उत्पादनांच्या व्यवहारात सहभागी असणाऱ्यांविरुद्ध कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्यात येईल", अशी प्रतिक्रिया तुकाराम मुंढे यांनी दिली.

तुकाराम मुंढेंकडून महत्त्वाची जबाबदारी काढून घेतली

पालक सचिवपदावरुन चारच महिन्यात हटवलं

तुकाराम मुंढे यांच्याकडे असलेल्या परभणीच्या पालक सचिवपदाच्या जबाबदारीतून त्यांना मुक्त करण्यात आलं असून ती जबाबदारी आता दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोपावण्यात आली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून धडाडीची कामगिरी करणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्यासंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. त्यांच्याकडे असलेल्या परभणीच्या पालक सचिवपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात आलं आहे. त्यांच्याऐवजी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे आता परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव असताना, 23 फेब्रुवारी 2026 रोजी तुकाराम मुंढे यांच्याकडे परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात होती. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे हे या आधी मंत्रालयात सचिव असताना त्यांच्याकडे परभणी जिल्ह्याच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली होती. आता तुकाराम मुंढे हे सचिव नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे असलेली पालक सचिवपदाची जबाबदारी आता दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आली आहे. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार



यांच्याकडे आता परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी असेल. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार हे सध्या राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव आहेत.

पालक सचिव म्हणजे काय ?

एखाद्या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शासनाकडून पालक सचिवपदी वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्तील केली जाते. हे पद महत्त्वाचं मानलं जातं. त्या माध्यमातून शासनाचे धोरणात्मक निर्णय, कल्याणकारी योजना यांची प्रभावी पद्धतीने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पालक सचिवाकडे असते. संबंधित जिल्ह्याच्या पालक सचिवाला वर्षातून चार वेळा किंवा तीन महिन्यातून किमान एकदा दौरा करून विकासकामांचा आढावा घ्यावा लागतो. त्या जिल्ह्याच्या विकासासाठी नेमके उपाय सूचवण्याची, तसा अहवाल सूचवण्याची जबाबदारी पालक सचिवावर असते.

तुकाराम मुंढेंचा कारवाईचा धडाका

अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची जबाबदारी घेताच धडाडीचे आयएएस अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम मुंढेंनी कारवाईचा धडाका लावला आहे. राज्यभरात विविध ठिकाणी छापेमारी करत त्यांनी अनेक ठिकाणच्या भेसळ उघडकीस आणल्या. तसेच त्यांनी या प्रकरणात अनेकांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे राज्यभरात भेसळ करणाऱ्या व्यापारी आणि दलालांचे धाबे चांगलेच दणाणल्याचं चित्र आहे. तुकाराम मुंढे यांच्या या कारवाईचे सर्वसामान्य लोकांमधून कौतुक केलं जात आहे. या कारवायांमुळे व्यापाऱ्यांच्या दबावात येऊन अन्न व औषध प्रशासनामधून त्यांची बदली करण्यात येऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अंधेरीत महिलांसोबत धक्कादायक प्रकार

ओळखीचा फायदा घेऊन फसवणूक

मुंबईत अधिक नफा मिळवून देण्याचे आश्वासन देत
गुंतवणुकीच्या नावाखाली दोन महिलांची तब्बल 27 लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,



मुंबईत अधिक नफा मिळवून देण्याचे आश्वासन देत गुंतवणुकीच्या नावाखाली दोन महिलांची तब्बल 27 लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी संबंधित आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटनांबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे. अशा प्रकारच्या गुंतवणूक योजनांमध्ये मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक केली जात असल्याचे तपासातून समोर येत आहे. काय घडलं नेमकं ? सविस्तर जाणून घेऊया.

जास्त नफ्याच्या आशेने महिलांनी गुंतवले लाखो रुपये

तक्रारदार महिलांना व्यवसाय विस्तार आणि गुंतवणुकीतून मोठा आर्थिक फायदा मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. सुरुवातीला योजना विश्वासार्ह वाटावी यासाठी आकर्षक परताव्याची माहिती देण्यात आली. आरोपींनी स्वतःला अनुभवी व्यावसायिक म्हणून सादर करत महिलांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने लाखो रुपयांची गुंतवणूक करून घेतली गेली. मात्र ठरल्याप्रमाणे परतावा मिळाला नाही आणि संशय निर्माण झाल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघड झाला.

पैसे परत मागितल्यावर टाळाटाळ सुरू

गुंतवणुकीवरील नफा आणि मूळ रक्कम परत मिळवण्यासाठी महिलांनी वारंवार संपर्क साधला. सुरुवातीला विविध कारणे देऊन वेळ मारून नेण्यात आला. काही काळानंतर आरोपींकडून प्रतिसाद मिळणेही बंद झाले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्यावर महिलांनी पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी आर्थिक व्यवहारांची माहिती, बँक खात्यांचे तपशील आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी सुरू केली आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासाला वेग

प्राथमिक चौकशीनंतर फसवणूक आणि विश्वासघातासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास यंत्रणा आरोपींनी इतर कोणालाही अशाच प्रकारे गंडा घातला आहे का याचीही माहिती घेत आहे. आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी बँकिंग आणि डिजिटल पुराव्यांची छाननी सुरू आहे. आरोपींनी नागरिकांना आकर्षित करण्यासाठी कोणती पद्धत वापरली याचाही शोध घेतला जात आहे.

गुंतवणूक फसवणुकीच्या घटना वाढत असल्याची चिंता

मुंबई आणि आसपासच्या भागात बनावट गुंतवणूक योजना, ऑनलाइन ट्रेडिंग प्लॅटफॉर्म आणि अवास्तव परतावा देणाऱ्या स्कीमच्या माध्यमातून फसवणुकीच्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये सुरुवातीला लहान रकमेवर परतावा देऊन गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकला जातो आणि नंतर मोठी रक्कम उकळली जाते. पोलिसांनी नागरिकांना कोणतीही योजना स्वीकारण्यापूर्वी तिची खातरजमा करण्याचा सल्ला दिला आहे.

नागरिकांसाठी महत्त्वाचा इशारा

तज्ञांच्या मते, "कमी वेळेत दुप्पट पैसे" किंवा "हमीशीर मोठा परतावा" अशा दाव्यांपासून सावध राहणे आवश्यक आहे. गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीची नोंदणी, परवाने, आर्थिक विश्वासार्हता आणि अधिकृत कागदपत्रांची पडताळणी करणे गरजेचे आहे. कोणतीही शंका आल्यास त्वरित पोलिस किंवा सायबर हेल्पलाइनशी संपर्क साधावा. जागरूकता आणि पडताळणी हीच अशा आर्थिक फसवणुकीपासून बचावाची सर्वात प्रभावी उपाययोजना ठरू शकते.

अखेर राज्यात मान्सून सक्रिय

येत्या ४८ तासांत मुंबईत मान्सून दाखल होणार, हवामान खात्याची माहिती

गेल्या दोन आठवड्यांपासून दडी मारून बसलेला मान्सून अखेर राज्यात पुन्हा एकदा सक्रिय झाला असून, यामुळे बळीराजासह सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

■पुणे। प्रतिनिधी,

गेल्या दोन आठवड्यांपासून दडी मारून बसलेला मान्सून अखेर राज्यात पुन्हा एकदा सक्रिय झाला असून, यामुळे बळीराजासह सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. येत्या २४ ते ४८ तासांत मुंबईसह राज्याच्या उर्वरित भागांत मान्सून पोहोचण्यासाठी अतिशय अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे, असे हवामान विभागाने सांगितले.

८ जून रोजी राज्यात दाखल झाल्यानंतर मान्सूनची प्रगती थांबली होती, मात्र तब्बल १४ दिवसांच्या खंडानंतर आता मान्सूनने पुणे, सोलापूर, धाराशिव आणि अलिबाग या भागांमध्ये आपले पाऊल ठेवले आहे.

उत्तर दिशेकडून येणारे कोरडे वारे आणि मान्सूनच्या वाऱ्यांच्या कमी झालेल्या तीव्रतेमुळे मान्सूनची वाटचाल थांबली होती. तसेच मान्सूनसाठी 'एमजीओ' घटक अनुकूल स्थितीत नव्हता. मात्र, आता 'एमजीओ' दुसऱ्या फेजमध्ये असून मस्करीन हाय आणि इतर विषुववृत्तीय लहरी मान्सूनसाठी पूरक ठरत आहेत, ज्यामुळे मान्सूनचे वारे पुन्हा एकदा बळकट झाले आहेत, अशी माहिती पुणे वेधशाळेचे



शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली. उपग्रह नकाशांनुसार अरबी समुद्रासह कोकण किनारपट्टी आणि महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात पावसासाठी पोषक ढग जमा झाले आहेत, असे त्यांनी सांगितले.

येत्या तीन ते चार दिवसांच्या हवामान अंदाजाबाबत बोलताना डॉ. सानप यांनी सांगितले की, कोकण-गोव्यासह अंतर्गत महाराष्ट्रात मेघगर्जनेसह आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. २७ आणि २८ जून रोजी कोकण किनारपट्टीसाठी 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला असून, या काळात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. तसेच २४ आणि २५ जून रोजी घाटमाथ्यावर 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून तेथेही जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुण्याचा विचार केल्यास, शहरात गेल्या काही दिवसांत पावसाची तीव्रता कमी-जास्त प्रमाणात होती, जसे की एनडीए परिसरात ८१ मिमी तर शिवाजीनगर येथे १८ मिमी पावसाची नोंद झाली होती; मात्र इथून पुढचा पाऊस हा मान्सूनचाच असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

आतापर्यंत पावसाची ७० टक्के तूट

राज्यातील पावसाच्या एकूण आकडेवारीचा विचार केला असता, जून महिन्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा ७० टक्क्यांहून अधिक पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. या वर्षाचा मान्सूनचा एकूण अंदाज सरासरीच्या ९० टक्के राहण्याची शक्यता असून, जून ते सप्टेंबर या काळात पाऊस सरासरीपेक्षा कमी राहू शकतो.

मान्सून सक्रिय झाला असला तरी शेतकऱ्यांसाठी हवामान विभागाने आणि कृषी विभागाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. केवळ पावसाचे आगमन झाले म्हणून शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला डॉ. सानप यांनी दिला आहे.

येत्या ४८ तासांत मुंबईत मान्सून दाखल होणार

येत्या ४८ तासांत मुंबई शहरात मान्सून दाखल होण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, सोमवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह मुंबईच्या विविध भागात काही ठिकाणी हलक्या सरी बरसल्या. तसेच मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्र परिसरातही हलक्या सरी बरसल्या.

हवामान विभागाने मुंबईसाठी 'यलो अलर्ट' जारी केला असून मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच २९ जूननंतर पावसाचा जोर अधिक वाढेल, असा अंदाज आहे.

पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना अटक

■भाईंदर। प्रतिनिधी,



सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्यांना ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या पोलीस अमलदारांवर जीवघेणा हल्ला करून शासकीय कामात अडथळा आणल्याची धक्कादायक घटना भाईंदर पश्चिम भागात घडली आहे. या प्रकरणी भाईंदर पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्या विरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. भाईंदर पश्चिम येथील संतोष टॉकीजच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या मैदानामध्ये तीन इसम दारू पिऊन लोकांना त्रास होईल अशा प्रकारे गैरवर्तन करत होते. या बाबत माहिती मिळताच भाईंदर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे व त्यांचे पथक कारवाईसाठी घटनास्थळी पोहोचले.

पोलिसांनी हुल्लडबाजी करणाया आरोपींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. मात्र, तेथेही त्यांनी सार्वजनिक शांततेचा भंग करत गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना शासकीय रुग्णालयात घेऊन जात असताना, आरोपींनी पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे यांना मारहाण करून किरकोळ दुखापत केली. एवढ्यावरच न थांबता शासकीय रुग्णालयात गेल्यानंतरही त्यांनी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला. त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी तेथे कर्तव्यावर असलेले पोलीस अमलदार कोळेकर, भोसले आणि बोरसे यांच्यावरही हल्ला केला, त्यांना मारहाण करून किरकोळ दुखापत केली आणि शासकीय कामात अडथळा आणला. पोलिसांनी याप्रकरणी कानाराम मुलचंद छिपा (वय ३९ वर्षे), सोनाराम धमार्जी चौधरी (वय ४९ वर्षे) व दिनेश बोमाराम चौधरी (वय २९ वर्षे) या तीन आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलमा सह महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलमा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हितेंद्र चव्हाण करत आहेत.

२०० हून अधिक आधारकार्ड कचऱ्यात

उल्हासनगर शहरातील आनंदनगर फर्स्ट गेट,
उल्हासनगर-अंबरनाथ मार्ग परिसरात २०० पेक्षा अधिक आधारकार्ड रस्त्याच्या कडेला फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



■उल्हासनगर। प्रतिनिधी,

शहरातील आनंदनगर फर्स्ट गेट, उल्हासनगर-अंबरनाथ मार्ग परिसरात २०० पेक्षा अधिक आधारकार्ड रस्त्याच्या कडेला फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रस्त्याच्या कडेला विखुरलेल्या ओळखपत्रांची पाहणी केली असता त्यावरील पत्ते आणि छायाचित्रे बहुतांश उल्हासनगर कॅम्प क्रमांक ५ भागातील रहिवाशांची असल्याचे आढळून आले आहे.

नागरिकांच्या ओळखीचा महत्त्वाचा दस्तावेज थेट रस्त्यावर कसा पोहोचला, याबाबत आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. वितरण प्रक्रियेत कोणाकडून हलगर्जीपणा झाला का, याचा तपास मध्यवर्ती पोलीस करत आहेत. दरम्यान, नागरिकांनी तत्काळ सतर्कता दाखवत सर्व ओळखपत्रे जमा करून मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केली असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

यंदा भारतीय पर्यटन कंपन्यांवर सायबर हल्ले

बुकिंगसाठी गर्दीचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न

सुट्ट्यांच्या बुकिंगसाठी होणाऱ्या गर्दीचा गैरफायदा घेण्यासाठी सायबर गुन्हेगार भारताच्या पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर लक्ष्य करत आहेत.

ऑनलाइन ट्रॅव्हल्स वेबसाइटची नक्कल

सायबर हल्लेखोर नामांकित आणि विश्वासार्ह ऑनलाइन ट्रॅव्हल बुकिंग प्लॅटफॉर्मची हुबेहूब नक्कल करत आहेत. ह्यचेक पॉइंटह्नने बुकिंग.कॉम, एअरबीएनबी आणि स्कायस्कॅनरसारख्या कंपन्यांची नक्कल करणाऱ्या बनावट डोमेन्सचा वापर करून सुरू असलेल्या 'फिशिंग मोहिमा' शोधून काढल्या आहेत. यासोबतच, अमेरिकन एक्सप्रेस आणि लॉयड्स ट्रॅव्हल चॉईससारख्या ब्रँड्सची नक्कल करणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील बनावट नोंदणी मोहिमांचाही यात समावेश आहे.

■नवी दिल्ली। प्रतिनिधी,

सुट्ट्यांच्या बुकिंगसाठी होणाऱ्या गर्दीचा गैरफायदा घेण्यासाठी सायबर गुन्हेगार भारताच्या पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर लक्ष्य करत आहेत. या क्षेत्रातील संस्थांना जागतिक सरासरीपेक्षा मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ल्यांचा सामना करावा लागत आहे.

'चेक पॉइंट रिसर्च'च्या अहवालानुसार, गेल्या सहा महिन्यांत भारतीय संस्थांना दर आठवड्याला सरासरी ३,२९६ सायबर हल्ल्यांचा सामना करावा लागला, तर याची जागतिक सरासरी २,०८५ आहे.

मे २०२६ मध्ये आदरातिथ्य, पर्यटन आणि मनोरंजन क्षेत्रातील प्रत्येक संस्थेला दर आठवड्याला सरासरी २,२९१ हल्ल्यांना सामोरे जावे लागले. जे मागील वर्षाच्या तुलनेत २४ टक्क्यांची वाढ दर्शवते.



याउलट, सर्व उद्योगांमधील सायबर हल्ल्यांची जागतिक वार्षिक वाढ केवळ २ टक्के होती.

एका विशिष्ट उद्योगाला लक्ष्य करणारी जाणीवपूर्वक आणि हंगामी तीव्रता आहे. हा उद्योग प्रचंड प्रमाणात वैयक्तिक आणि आर्थिक डेटा हाताळतो आणि नेमके याच वेळी लोक घाईगडबडीत असतात. त्यांचे लक्ष विचलित झालेले असते आणि स्वस्तात डील मिळवण्यासाठी ते उत्सुक असतात, असे चेक पॉइंटच्या अहवालात म्हटले आहे.

भारतात हा धोका अधिक वाढला आहे, कारण गेल्या महिन्यात आढळलेल्या घातक फाइल्सपैकी ८६ टक्के फाइल्स वेबद्वारे पाठवल्या गेल्या होत्या. यावरून हे स्पष्ट होते की पर्यटकांना लक्ष्य करण्यासाठी सायबर गुन्हेगारांकडे बनावट ट्रॅव्हल वेबसाइट्स, फसव्या बुकिंग पोर्टल्स आणि घातक ऑनलाइन जाहिराती ही सर्वात प्रभावी हत्यारे बनली आहेत.

मे २०२६ मध्ये, पर्यटनाशी संबंधित ४७,३१८ नवीन डोमेन्सची नोंदणी झाली, जी एप्रिलच्या तुलनेत ३३ टक्के आणि मे २०२५ च्या तुलनेत १९ टक्के जास्त आहे. यापैकी प्रत्येक ११२ डोमेन्सपैकी एक डोमेन आधीच 'घातक' किंवा 'संशयास्पद' म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. यातील बरेच डोमेन्स सुट्ट्यांच्या काळातील ट्रॅफिकचा गैरफायदा घेण्यासाठी सक्रिय होईपर्यंत सुप्त अवस्थेत ठेवले जातात.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

परीक्षेचा क्षण



यंदाचा मान्सून अद्यापही अनिश्चिततेच्या सावटाखाली आहे. कमी पावसामुळे शेती, जलसाठे आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची भीती वाढली असून, एल निनोच्या प्रभावामुळे देशासमोर मोठे हवामानविषयक आव्हान उभे राहिले आहे.

जून महिना अर्धा संपत आला, पण देशात अद्याप समाधानकारक पावसाची सुरुवात झालेली नाही. ''नेमेचि येतो पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा'' ही कविता आता जणू पुस्तकांपुरतीच मर्यादित राहिली आहे. भारताची शेती आणि अर्थव्यवस्था या दोन्ही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे पाऊस कमी झाला तर त्याचा फटका या दोन्ही क्षेत्रांना बसतो. परिणामी शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या अडचणी वाढतात. देशपातळीवर विचार केला तर आतापर्यंत सरासरीपेक्षा सुमारे ३५ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. तर मध्य भारतात पावसाची तूट तब्बल ६३ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. हे आकडे निश्चितच चिंताजनक आहेत. कारण पावसाची सुरुवातच इतकी संथ आणि कमकुवत झाली असेल, तर पुढील काळात परिस्थिती काय स्वरूप धारण करेल, याची चिंता शेतकरी आणि अर्थतज्ज्ञ या दोघांनाही सतावत आहे. महाराष्ट्रातही पावसाची वाटचाल जवळपास ठप्प झाली आहे. मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांतील जलसाठा इतका खालावला आहे की उपलब्ध पाणी केवळ पुढील ४५ दिवस पुरेल, अशी स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, हवामान विभागाने (आयएमडी) काही भागांमध्ये ६० टक्क्यांपर्यंत कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. हा अंदाज केवळ शेतकऱ्यांचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची चिंता वाढवणारा आहे. पावसाच्या या अनिश्चिततेमुळे शेती, अर्थव्यवस्था आणि जनजीवन यांच्यासमोर एक मोठी परीक्षा उभी ठाकली आहे. कमी पावसाचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणून एल निनो इफेक्टचा उल्लेख केला जातो. एल निनोमुळे पॅसिफिक महासागरातील पाण्याचे तापमान वाढते आणि जागतिक वाऱ्यांच्या प्रवाहात बदल होऊन मान्सूनवर प्रतिकूल परिणाम होतो. परिणामी पाऊस कमी होतो किंवा उशिरा दाखल होतो. कमी आणि विलंबाने झालेल्या पावसाचा थेट परिणाम खरीप पिकांवर होतो. खरीप हंगाम हातातून जाण्याचा धोका निर्माण होतो, ज्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. देशासमोरील मोठे आव्हान केवळ आंतरराष्ट्रीय घडामोडी किंवा इतर भू-राजकीय संकटे नसून, एल निनोचा भारतीय शेती आणि शेतकऱ्यांवर होणारा परिणाम हे आहे. भारतासमोर सध्या दुहेरी आव्हान आहे. एकीकडे कमी पावसाचा धोका आणि दुसरीकडे त्यातून निर्माण होणारी महागाई व अन्नधान्य टंचाईची शक्यता. ही चिंता अधिक वाढली जेव्हा हवामान विभागाने २०२६ साठी एलपीए पावसाचा अंदाज सामान्य पावसाच्या तुलनेत कमी राहण्याची शक्यता दर्शवली. पाऊस सरासरीपेक्षा कमी राहिल्यास त्याचे परिणाम शेतीपुरते मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतात. भारतीय अर्थव्यवस्था अजूनही शेतीवर अवलंबून आहे. शेती क्षेत्रावर परिणाम झाल्यास ग्रामीण भागातील उत्पन्न कमी होते, मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. कृषी क्षेत्र आजही भारताच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. देशातील सुमारे ४५ टक्के लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीचे उत्पन्न, उत्पादन आणि हवामानातील बदल यांचा परिणाम घरगुती उत्पन्न, महागाई तसेच एकूण उपभोगाच्या पातळीवर होत असतो. अशा परिस्थितीत कमी पाऊस किंवा अवर्षणाचा परिणाम व्यापक स्वरूपात जाणवणे साहजिक आहे. या परिस्थितीवर दीर्घकालीन उपाय म्हणून पीक पद्धतीत बदल करणे आणि जास्त पाणी लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र कमी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशासारख्या राज्यांमध्ये उसासारख्या पाणीखाऊ पिकांना मोठे महत्त्व दिले जाते. मात्र, अनेक भागांमध्ये धरणे, तलाव आणि इतर जलस्रोतांवर ताण वाढत असून काही ठिकाणी पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही वेळा राजकीय कारणांमुळे आवश्यक निर्णय घेण्यास विलंब होतो, पण बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर आता या विषयावर ठोस पावले उचलण्याची गरज आहे. दुष्काळाचा सामना करू शकणाऱ्या पिकांकडे शेतकऱ्यांनी हळूहळू वळणे हा भविष्यासाठी महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. सध्याच्या पावसाचे प्रमाण आणि हवामानाचे अंदाज पाहता देशातील काही भागांमध्ये अवर्षणाची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, शेतकऱ्यांनी लगेच घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. सरकारच्या मते एल निनोचा परिणाम यावेळी फार व्यापक स्वरूपाचा नसेल आणि पिकांची उत्पादकता तसेच पावसाच्या प्रमाणावर त्याचा मोठा परिणाम होणार नाही, अशी अपेक्षा आहे. तरीही बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत शेती पद्धतीत सुधारणा, पाण्याचा योग्य वापर, पीक विविधीकरण आणि कमी संसाधनांमध्ये उत्पादन देणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. जूनच्या मध्यापर्यंत अपेक्षेइतका पाऊस झाला नाही आणि सुमारे ३२ टक्के तूट नोंदवली गेली. तरीही शेतकरी खरीप पेरण्यांमध्ये व्यस्त असून, विशेषतः तांदळाच्या लागवडीवर भर देत आहेत. युद्धजन्य परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीमुळे उत्पादकतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे, त्यामुळे शेतकरी आणि कृषी व्यवस्थेसमोर आव्हाने निर्माण झाली आहेत. अर्थतज्ञांच्या मते, भारतीय शेतकरी कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यास सक्षम आहेत. कृषी मंत्रालयाच्या माहितीनुसार, खरीप लागवडीचे क्षेत्र अद्याप घटलेले नाही आणि ते ८४.६ लाख हेक्टर आहे. एल निनोच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास सरकारकडून सुरू आहे, मात्र सध्या परिस्थिती चिंताजनक पातळीवर नसल्याचे सांगितले जात आहे. तरीही शेतकऱ्यांना सावध राहण्याची गरज आहे. जून संपत आला असताना पाऊस अपेक्षेप्रमाणे झालेला नाही. कमी मॉन्सूनमुळे उत्पादन घटणे, जलाशयांची पातळी कमी होणे आणि भूजल उपशावर दबाव वाढणे अशी आव्हाने निर्माण होऊ शकतात. यावर रेनवॉटर हार्वेस्टिंगसारखे उपाय महत्त्वाचे ठरू शकतात. कमी पावसाचे दोन मोठे परिणाम होऊ शकतात. एक म्हणजे अन्नधान्य उपलब्धतेवर परिणाम आणि दुसरे म्हणजे ग्रामीण मागणी कमी होऊन अर्थव्यवस्थेवर दबाव येणे. सरकारने क्रायसिस मॅनेजमेंट ग्रुपसह विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे आगामी काळ हा सरकार आणि कृषी क्षेत्रासाठी निश्चितच एक महत्त्वाची परीक्षा ठरणार आहे.

जलनियोजनाच्या अभावामुळे पाणी टंचाईचा कहर!

ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभाग, महसूल यंत्रणा आणि स्थानिक नागरिक यांच्यात समन्वयाशिवाय कोणतीही पाणीपुरवठा योजना दीर्घकाळ यशस्वी होणार नाही. जलसंधारणासाठी खर्च होणारा निधी, टँकरकरार, जलजीवन मिशनची प्रत्यक्ष प्रगती, जलगुणवत्तेचे अहवाल हे सर्व जनतेसमोर खुले केले तर जबाबदारी वाढेल. पाण्याच्या प्रश्नावर केवळ दुष्काळ जाहीर करणे किंवा टँकर वाढवणे पुरेसे नाही. शासनाने जलशिस्त, जलनियोजन आणि जलन्याय या तिन्ही तत्त्वांवर उभे राहिले पाहिजे. तरच पाणी प्रश्न मार्गी लागेल.



सध्या महाराष्ट्रातील पाणीटंचाई ही केवळ ऋतुमानाशी संबंधित अडचण राहिलेली नाही. तर, ती शासन, नियोजन, पायाभूत सुविधा, सामाजिक विषमता आणि नैसर्गिक संसाधनांच्या अन्याय्य वापराचे उघडे पडलेले वास्तव बनली आहे. राज्याच्या अनेक भागांत जून महिना अर्धा संपला तरी पावसाने समाधानकारक हजेरी लावलेली नाही, धरणांतील जलसाठा घटला आहे, हजारो गावे अजूनही टँकरवर अवलंबून आहेत आणि धक्कादायक बाब म्हणजे धरणांच्या कुशीत राहणाऱ्यांनाच घोटभर पाण्यासाठी किलोमीटरभर चालावे लागत आहे. अशा वेळी पाणीटंचाईकडे केवळ 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. कारण ही टंचाई केवळ निसर्गाने निर्माण केलेली नाही. तर, तिची तीव्रता वाढवण्यात आपल्या विकासनीती, अपूर्ण योजना, गळती, पाण्याची चोरी, टँकर-आधारित व्यवस्था आणि दीर्घकालीन जलव्यवस्थापनातील दुर्लक्ष यांचाही मोठा वाटा आहे, हे मान्य करावेच लागेल.

राज्यातील सद्यस्थितीचा आढावा घेतला तर, चित्र अत्यंत गंभीर दिसते. मोठे, १५ जूनची आकडेवारी पाणीटंचाईचे भीषण वास्तव दाखवते. मध्यम आणि लघू मिळून ३,०२८ प्रकल्पांमध्ये सरासरी केवळ २४.७४ टक्के जलसाठा उरला असल्याची नोंद आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा साठा सुमारे पाच टक्क्यांनी कमी आहे. २० जिल्ह्यांतील सुमारे साडेतीन हजार गावे आणि वाड्यांना १००३ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे, ही आकडेवारी स्वतःच भीषणतेचे दर्शन घडवते. पुणे विभागात जलसाठा फक्त १४.५७ टक्के, नाशिकमध्ये २५.२०, छत्रपती संभाजीनगर विभागात २७.८३, कोकणात ३०.७०, तर अमरावती आणि नागपूर विभाग तुलनेने काहीसे बरे असले तरी तेही धोक्याच्या सीमारेषेबाहेर नाहीत. धरणातील पाणी कमी, पाऊस लांबलेला, तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सिअसदरम्यान आणि शेतकऱ्यांची मशागत पूर्ण होऊनही पेरणी रखडलेली. ही परिस्थिती ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही झळ पोहोचवणारी आहे.

महाराष्ट्रातील पाणी टंचाईचे सर्वाधिक त्रासदायक रूप ठाणे, पालघर, यवतमाळसह अनेक जिल्ह्यांत दिसून येते. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुका याचे जिवंत उदाहरण आहे. भातसा, तानसा आणि वैतरणा यांसारखी मुंबईला पाणीपुरवठा करणारी धरणे याच भागात असतानाही येथील आदिवासी महिला, पुरुष, लहान मुले आणि वृद्ध यांना दोन ते चार किलोमीटर चालत विहिरी, डबकी किंवा टँकरपाशी जावे लागते. २००८ पासून मंजूर झालेल्या नळपाणी योजनांमधून अजूनही नळाला पाण्याचा थेंब मिळालेला नाही, ही गोष्ट विकासाच्या दाव्यांना चपराक मारणारी आहे. सरकारच्या योजना कागदावर, तर पाणी आणण्यासाठी चाललेली पायपीट प्रत्यक्षात, अशी ही विषमता आहे. अधिक धक्कादायक बाब म्हणजे, भीषण टंचाईच्या काळातही काही शहरी प्रकल्पांसाठी दररोज लाखो लिटर पाणीचोरी होत असल्याचे आरोप समोर येत आहेत. यावरून पाण्याची टंचाई फक्त कमतरतेची नसून वितरणातील अन्यायाची आहे, हे स्पष्ट होते.

मिरा-भाईंदरमधील परिस्थिती शहरी जलसंकटाचे दुसरे रूप दाखवते. मुंबईलगतचे हे शहर वाढत्या लोकसंख्येमुळे आधीच पाणीपुरवठ्याच्या ताणाखाली आहे. कमी दाबाचा पाणीपुरवठा, वारंवार होणारे शटडाऊन, काही भागांत तीन-चार दिवसांनी येणारे पाणी, आणि नागरिकांचे खासगी टँकरवर वाढते अवलंबित्व, यामुळे शहरातील संताप वाढत आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे टँकरांना इतक्या मोठ्या प्रमाणावर पाणी मिळते कुठून? सामान्य नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नसताना टँकरवाल्यांकडे पाण्याची उपलब्धता कशी? हा प्रश्न केवळ संशय म्हणून टाळता येणार नाही. कारण जिथे पाणी दुर्मीळ होते, तिथे त्याभोवती अनौपचारिक बाजारपेठ, दलाली आणि मक्तेदारी निर्माण होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे पाणीटंचाईच्या समस्येला टँकर-राजकारण आणि टँकर-अर्थकारणाचीही जोड मिळत आहे. काही ठिकाणी टँकरचे पाणी दूषित असल्याच्या तक्रारी, तर काही ठिकाणी नागरिकांच्या हक्काचे पाणीच खासगी पुरवठ्याकडे वळवले जात असल्याचे आरोप, ही केवळ प्रशासनिक कमतरता नसून सार्वजनिक विश्वासाचा प्रश्न आहे.

ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने ५१ गावे आणि १५२ वाड्यांमधील १ लाख १० हजारांहून अधिक नागरिकांना ४८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केल्याचे म्हटले आहे. शहापूरमध्येच ४० गावे आणि १३९ वाड्यांतील जवळपास ९९ हजार नागरिक ४४ खासगी टँकरवर अवलंबून आहेत. मुरबाड आणि अंबरनाथमध्येही टँकरची मदत घ्यावी लागत आहे. प्रशासनाने समन्वय, सतर्कता आणि तातडीचे नियोजन केल्याचे चित्र जरी दिसत असले, तरी टँकर हा कोणत्याही सुजाण जलधोरणाचा अंतिम उपाय असू शकत नाही. टँकर तात्पुरता दिलासा देतात; पण ते जलन्याय, सुरक्षित पाणी, कमी खर्च आणि दीर्घकालीन शाश्वतता देत नाहीत. टँकरमुळे स्थानिक पाणीप्रश्न काही काळ लपवले जातात, ते सुटत नाहीत.

पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार आणि वाडा तालुक्यांमध्ये तर ही समस्या अधिक भीषण आहे. मोखाड्यात ४० हून अधिक गावपाड्यांना ११ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. जलजीवन मिशनमुळे घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचेल, अशी अपेक्षा होती, मात्र अपूर्ण कामे, निधीअभावी रखडलेल्या योजना आणि कागदोपत्री पूर्णतेचे दावे यामुळे वास्तव बदललेले नाही. सरकारी अहवालात अनेक नळपाणी योजना पूर्ण दाखवल्या जातात; पण घरात पाणी पोहोचत नसल्याने महिलांच्या डोक्यावरचा हंडा खाली उतरलेलाच नाही. ही ओळ संपूर्ण जलप्रशासनाचे अपयश सांगण्यासाठी पुरेशी आहे. योजना पूर्ण झाली की नाही, याचे मोजमाप कंत्राटाच्या बिलावर नव्हे, तर शेवटच्या घरापर्यंत नियमित, स्वच्छ आणि परवडणारे पाणी पोहोचले का, यावर झाले पाहिजे.

या सर्व उदाहरणांतून एक गोष्ट स्पष्ट दिसते. महाराष्ट्रातील पाणीटंचाई ही 'पाणी नाही' इतकी साधी समस्या नाही. तर, ती चार स्तरांवर उभी आहे. पहिला स्तर म्हणजे हवामानातील अनिश्चितता - पाऊस लांबणे, उष्णतेची तीव्रता, जलसाठ्यात घट. दुसरा स्तर म्हणजे पायाभूत सुविधांचे अपयश झ अपूर्ण नळयोजना, गळती, संचयन आणि पुनर्भरणाचा अभाव. तिसरा स्तर म्हणजे प्रशासनिक व राजकीय विलंब - वर्षानुवर्षे प्रचारात राहूनही पूर्ण न होणाऱ्या योजना, कागदोपत्री यश आणि प्रत्यक्षात अपयश. चौथा स्तर म्हणजे सामाजिक विषमता - शहरांना पाणी, पण धरणकाठच्या आदिवासींना तहान; इमारतींना टँकर, पण वाड्यांना डबकी; काहींसाठी प्रकल्प, तर काहींसाठी हंडाभर पाणी.


यावर उपायही तितकेच बहुआयामी असले पाहिजेत. पहिली गरज म्हणजे तातडीचे, पारदर्शक आणि न्याय्य पाणीवाटप. कोणत्या भागाला किती पाणी, कोणत्या स्रोतांतून, कोणत्या वेळापत्रकानुसार दिले जाते, याची सार्वजनिक माहिती उपलब्ध झाली पाहिजे. टँकरपुरवठ्याचे डिजिटल ट्रॅकिंग, जीपीएस-आधारित नोंद, पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी आणि नागरिकांसाठी तक्रारनिवारण प्रणाली बंधनकारक करणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे अपूर्ण नळपाणी योजना युद्धपातळीवर पूर्ण करणे. योजना मंजूर करून त्यांचे उद्घाटन करण्यापेक्षा प्रत्यक्ष जलप्रवाह सुरू होणे महत्त्वाचे आहे. तिसरे म्हणजे स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन - शेततळी, बंधारे, विहिरींचे पुनर्भरण, गावपातळीवरील जलसंधारण, झरे आणि ओढ्यांचे पुनरुज्जीवन. चौथे म्हणजे गळती आणि बेकायदेशीर पाणीउपसा रोखणे. शहरांमधील वितरण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात पाणी गळते; त्यावर नियंत्रण न आणता नवीन स्रोत शोधत राहणे म्हणजे गळक्या भांड्यात पाणी भरत राहण्यासारखे आहे.

याचबरोबर पाणी हा केवळ अभियांत्रिकीचा विषय नाही, तर शासनव्यवस्था आणि लोकसहभागाचा प्रश्न आहे. ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभाग, महसूल यंत्रणा आणि स्थानिक नागरिक यांच्यात समन्वयाशिवाय कोणतीही योजना दीर्घकाळ यशस्वी होणार नाही. जलसंधारणासाठी खर्च होणारा निधी, टँकरकरार, जलजीवन मिशनची प्रत्यक्ष प्रगती, जलगुणवत्तेचे अहवाल हे सर्व जनतेसमोर खुले केले तर जबाबदारी वाढेल. पाण्याच्या प्रश्नावर केवळ दुष्काळ जाहीर करणे किंवा टँकर वाढवणे पुरेसे नाही; शासनाने जलशिस्त, जलनियोजन आणि जलन्याय या तिन्ही तत्त्वांवर उभे राहिले पाहिजे. महाराष्ट्रासमोर आजचा प्रश्न केवळ या उन्हाळ्याचा नाही; तो भविष्यातील जलसुरक्षेचा आहे. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, औद्योगिक मागणी आणि बदलते हवामान या पार्श्वभूमीवर पाणी ही पुढील दशकातील सर्वात संवेदनशील सार्वजनिक संपत्ती ठरणार आहे. अशा वेळी तात्पुरत्या उपायांवर समाधान मानणे धोकादायक ठरेल. धरणे, पाइपलाइन, टँकर, नळयोजना या सर्वांची गरज आहेच; पण त्यासोबत जलस्रोतांचे संरक्षण, पुनर्भरण, नियोजनबद्ध वापर आणि स्थानिक समुदायांचा सहभाग अपरिहार्य आहे.

आज महाराष्ट्रातील अनेक भागांत महिलांच्या डोक्यावरचा हंडा अजूनही उतरलेला नाही, शेतकऱ्यांच्या शिवारात पेरणीची वाट पाहणारी जमीन कोरडी आहे, आणि शहरांमध्ये नागरिक टँकरकडे डोळे लावून बसले आहेत. हे दृश्य केवळ पाण्याअभावी नाही; ते प्रशासनिक असमतोल, विकासाच्या विसंगती आणि जलनीतीतील उणिवांचे प्रतिबिंब आहे. पाणीटंचाईकडे आपत्ती म्हणूनच नव्हे, तर सुधारणा घडवून आणण्याची शेवटची संधी म्हणून पाहिले पाहिजे. कारण पाण्याचा प्रश्न उद्यावर ढकलता येत नाही. तो दररोजच्या जगण्याचा प्रश्न आहे आणि म्हणूनच तो तातडीचा, मानवी आणि राजकीयदृष्ट्या सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. तो वर्षोनुवर्षे रेंगाळत न ठेवता कायमस्वरूपी सोडवण्याची नितांत

मुंढेंची बदलीमुळे ग्राहकांना दिलासा!

अन्न व औषध प्रशासनाची प्रतिमा मलीन होत असताना आणि मंत्री नरहरी झिरवाळ विविध वादांनी घेरलेले असताना, त्यांचे मंत्रीपद काढण्याऐवजी शासनाने त्यांच्या खात्यात तुकाराम मुंढेंसारखा कठोर अधिकारी पाठवून एकाच वेळी राजकीय संदेश आणि प्रशासकीय इशारा दिला. या सत्तेच्या खेळात सुखावला असेल, तर तो केवळ सर्वसामान्य ग्राहक. लोकशाहीत मंत्री धोरणात्मक निर्णय घेतात आणि अधिकारी त्याची अंमलबजावणी करतात. प्रत्यक्षात मात्र अनेक अधिकारी राजकीय दबावाखाली काम करतात. परिणामी कायद्याची धार बोथट होते. तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी दबाव झुगारतात. त्यामुळेच ते वारंवार बदलीचे 'मानकरी' ठरतात.



शरीरातील एखादी पेशी जेव्हा स्वतःच्या मर्यादा विसरते, नियंत्रण झुगारते आणि संपूर्ण शरीरालाच पोखरू लागते, तेव्हा कॅन्सर जन्माला येतो. व्यवस्थेचेही तसेच असते. जेव्हा जबाबदारीचे भान हरपते, नियमांचा अर्थ बदलतो, अधिकारांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांचा सौदा होतो आणि जनहितापेक्षा स्वार्थाला प्राधान्य मिळते, तेव्हा 'भ्रष्टाचाराचा कॅन्सर' संपूर्ण यंत्रणेला ग्रासू लागतो. त्याचे सर्वाधिक भयावह परिणाम सामान्य माणसाच्या आयुष्यावर उमटतात. दुधातील भेसळ, पनीरमध्ये मिसळले जाणारे घातक पदार्थ, निकृष्ट दर्जाच्या तेलाचा स्वयंपाकघरात होणारा वापर, बनावट औषधांची विक्री, संशयास्पद सौंदर्यप्रसाधनांचा बाजार आणि बंदी असतानाही खुलेआम विकला जाणारा गुटखा या सर्वांची परिणती कुठे तरी नागरिकांच्या आरोग्यावर होत असते. कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारांच्या वाढत्या सावटाकडे पाहताना या वास्तवाकडे डोळेझाक करून चालणार नाही. महत्त्वाचे म्हणजे, विष नेहमी बाटलीवर कवटीचे चिन्ह घेऊन येत नाही, ते अनेकदा दुधाच्या पिशवीतून, मसाला दुधाच्या ग्लासातून, आकर्षक पॅकिंगमधील पनीरमधून किंवा रंगीबेरंगी पुड्यांमधून आपल्या घरात प्रवेश करत असते.

अन्न आणि औषध प्रशासनाच्या यापूर्वीच्या उदासीन कारभारामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ज्या विभागावर नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे, त्याच अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत समाजात इतकी संशयाची भावना का निर्माण झाली? नियम होते, कायदे होते, यंत्रणा होती, कर्मचारी होते; पण तरीही भेसळीचे साम्राज्य वाढत राहिले. निकृष्ट दर्जाच्या वस्तूंना बाजारपेठ मिळत राहिली. गुटख्यावर बंदी असतानाही तो प्रत्येक गल्लीबोळात सहज उपलब्ध होता. जणू कायद्याचा धाक नव्हता आणि कारवाईची भीती उरली नव्हती. नियमांचे पालन करण्याऐवजी नियमांना वाकवण्याची सवय लागलेल्या व्यवस्थेमुळे हे गोरखधंदे फोफावत गेले. त्यामुळे अधिकृत यंत्रणांच्या मूक संमतीशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर हा काळाबाजार फोफावू शकतो का? सरकारी आशीर्वादाशिवाय हे शक्य आहे का? असे प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

विशेषतः मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यकाळात अन्न व औषध प्रशासनातील भ्रष्टाचाराच्या चर्चांनी जोर धरला. अन्नभेसळ, अनधिकृत गुटखाविक्री, निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांवरील अर्पुया कारवाया याबाबत विभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असतानाच झिरवाळ स्वतःही विविध वादग्रस्त प्रकरणांमुळे चर्चेत राहिले. त्यांच्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये काही महिन्यांपूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापा टाकत दोन कर्मचाऱ्यांवर कारवाई केली होती. परिणामी, जनतेच्या आरोग्याचे रक्षण करणारी यंत्रणाच संशयाच्या भोर्वयात सापडली. ठोस पुराव्याअभावी झिरवाळांचे मंत्रीपद काढणे हा राजकीयदृष्ट्या धोक्याचा संदेश ठरू शकला असता; त्याऐवजी त्यांच्या खात्यात तुकाराम मुंढेंसारख्या कठोर, दबावाला न झुकर्णाया अधिकर्ायाची नियुक्ती करून शासनाने एका दगडात दोन पक्षी मारले. हा निर्णय झिरवाळांसाठी मूक इशारा होता, तर सर्वसामान्य ग्राहकांसाठी आश्वासक दिलासा. सर्वसामान्यांना राजकीय समीकरणांपेक्षा आपल्या ताटात काय वाढले जाते आणि आपल्या औषधांमध्ये काय मिसळले जाते, याची अधिक चिंता असते.

झिरवाळांच्या कार्यकाळात कालपर्यंत शहरातील कोणत्याही हॉटेलमध्ये मेन्यूकार्ड उघडताच पनीर चिल्ली, पनीर मसाला, कढई पनीर, पनीर टिक्का, पनीर भुर्जी असे पदार्थ ठळकपणे नजरेस पडायचे. पण गेल्या काही दिवसांत चित्र बदलले. अनेक हॉटेलांमध्ये पनीरचे पदार्थ उपलब्ध नसल्याचे दिसू लागले. कारण विचारले असता एकच उत्तर मिळू लागले, 'पनीरचा शॉर्टेज आहे.' सुरुवातीला अनेकांनी त्याकडे सहज दुर्लक्ष केले. बाजारात कधी कांद्याचे भाव वाढतात, कधी टोमॅटो महाग होतात, तसा काहीसा प्रकार असावा, असे वाटले. पण जसजसे दिवस पुढे गेले, तसतसे हे चित्र अधिक व्यापक असल्याचे दिसू लागले. मसाला दूध विकर्णाया गाड्या विरळ झाल्या. रबडीचे स्टॉल ओस पडले. बासुंदी विक्रेते शांत झाले. काही ठिकाणी गुटखा अचानक गायब झाला. कालपर्यंत सहज उपलब्ध असर्णाया गोष्टी अचानक दुर्मिळ का झाल्या? असे काय घडले की भेसळयुक्त आणि अनधिकृत पदार्थांची टंचाई निर्माण झाली? इतका मोठा योगायोग असू शकतो का? प्रश्न वस्तूंच्या अनुपलब्धतेचा नाही, प्रश्न इतकी वर्षे त्या उपलब्ध कशा होत्या, याचा आहे.

लोकशाहीत मंत्री धोरणात्मक निर्णय घेतात आणि अधिकारी त्याची अंमलबजावणी करतात, असे मानले जाते. प्रत्यक्षात मात्र अनेक अधिकारी राजकीय दबावाखाली काम करतात. काही तडजोड करतात, काही शांत राहतात आणि काही परिस्थितीशी जुळवून घेतात. परिणामी कायद्याची धार बोथट होते. तुकाराम मुंढे यांसारखे अधिकारी या चौकटीबाहेर जाण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच ते चर्चेत येतात. तब्बल २५ बदल्या पचवूनही मुंढे यांची प्रतिमा बदलली नाही. उलट प्रत्येक नव्या जबाबदारीत त्यांनी स्वतःची वेगळी छाप सोडली. अन्न व औषध प्रशासनात त्यांच्या आगमनानंतर राज्यभर धाडसत्र सुरू झाले. दूध भेसळ करर्णायांवर कारवाई झाली. पनीर उत्पादकांवर छापे पडले. हॉस्पिटल्स आणि मेडिकल स्टोअर यांचे साटेलोटे थांबवण्याचे आदेश निघाले. औषध विक्रेत्यांची तपासणी सुरू झाली. नोटिसा बजावण्यात आल्या. अनेकांचे परवाने धोक्यात आले. जे वर्षानुवर्षे 'सगळं सुरळीत चाललंय' या भ्रमात होते, त्यांना अचानक कायद्याचा धाक जाणवू लागला. हे सर्व आधी का घडले नाही? कायद्यांची कमतरता होती का? अधिकार नव्हते का? कर्मचारी नव्हते का? एका अधिकर्ायाच्या आगमनानंतरच कारवाईचे वादळ कसे उठले? याचा अर्थ समस्या कायद्याची नव्हती, समस्या इच्छाशक्तीची होती.

मोठ्या प्रतीक्षेनंतर मुंढेंसारखा एखादा अधिकारी कठोर कारवाया सुरू करतो आणि त्याला जीवे मारण्याच्या धमक्या मिळतात, तेव्हा धमक्या त्या व्यवस्थेलाच दिलेले आव्हान असते. अवैध धंद्यांची साखळी मोडू लागली की आर्थिक हितसंबंध अस्वस्थ होतात. दबाव, बदनामी, हस्तक्षेप आणि धमक्या सुरू होतात. याच टप्प्यावर अधिकाऱ्याचे धैर्य कसोटीवर लागते. अर्थात, तुकाराम मुंढे यांची कार्यशैली अशा धमक्यांना घाबरणारी अशी मुळीच नाही. म्हणून नेहमीच त्यांच्या कामाचे कौतुकच झाले असेही नाही. त्यांच्यावर टीकाही झाली. काहींना ते प्रामाणिक, निर्भीड आणि जनहितासाठी लढणारे अधिकारी वाटतात. तर काहींना ते अव्यवहारी, संवादात कठोर आणि तडजोड न करणारे प्रशासक वाटतात. नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीवर त्यांचा भर राहिला आहे. गैरव्यवहारांविरोधातील स्पष्ट भूमिका आणि दबावाला न झुकण्याची वृत्ती ही त्यांची ताकद मानली जाते. मात्र प्रशासन केवळ नियमांवर चालत नाही. ते मानवी संबंध, संवाद, स्थानिक वास्तव आणि समन्वयावरही उभे असते. निर्णय योग्य असले तरी ते मांडण्याची पद्धत लवचीक असावी. लोकप्रतिनिधी, कर्मचारी आणि विविध घटकांना विश्वासात घेण्याची कला तेवढीच महत्त्वाची असते.

मुंढे यांच्या बाबतीत हा समतोल अनेकदा बिघडल्याचेही म्हटले जाते. पण ज्याला काहीजण दोष म्हणतात, तोच त्यांचा सर्वात मोठा गुण आहे, तडजोड न करणे. तडजोडीच्या नावाखाली भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप आणि नियमभंगाला खतपाणी घालणारी व्यवस्था तयार होते. त्यामुळे तत्त्वांशी तडजोड न करणाऱ्या अधिकाऱ्यांचे स्वागत व्हायला हवे. त्यांच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन करताना भावनिक अतिरेक टाळणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची दखल घेताना मर्यादांची नोंद घ्यावी आणि मर्यादांवर टीका करताना त्यांच्या प्रामाणिकतेचे मूल्यही मान्य करावे. अर्थात प्रत्येक प्रश्न काळा किंवा पांढरा नसतो, हे मुंढेंनींही जाणून घ्यावे. अनेकदा मधला मार्ग शोधावा लागतो. म्हणूनच मुंढे यांच्या कार्यपद्धतीबाबत मतभेद कायम राहतात. त्यांच्या वारंवार होर्णाया बदल्यांमुळे त्यांची लोकप्रियता कमी झाली नाही. उलट प्रत्येक वेळी सामाजिक माध्यमांवर त्यांच्या समर्थनार्थ मोहिमा राबवल्या गेल्या. 'प्रामाणिक अधिकाऱ्यांना काम करू दिले जात नाही,' अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. ही भावना सामान्य नागरिक आणि व्यवस्था यांच्यातील वाढत्या दुराव्याचे प्रतीक मानावी लागेल.

मुंढे नावाचे वादळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नाही. प्रशासनात आदर्श अधिकारी कोणाला म्हणायचे, याबाबतचा तो व्यापक वाद आहे. नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणारा अधिकारी आदर्श की परिस्थितीनुसार लवचिकता दाखवणारा अधिकारी आदर्श? कठोर निर्णय घेणारा अधिकारी हवा की सर्वांना सोबत घेऊन चालणारा? या प्रश्नांची उत्तरे अनुभवांनुसार बदलतात. अन्न व औषध प्रशासनात मुंढे यांच्या आगमनाने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करर्णायांना कायद्याचा धाक वा



पावसाळ्यामध्ये चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ, अन्यथा भोगावे लागतील दुष्परिणाम!

पालक – पालक तुम्हाला पावसाळ्याच्या काळात सहज उपलब्ध होईल, पण या भाजीचे पावसाळा सुरु झाला कि सेवन न करणे उत्तम ठरते. यामागे काहीही तर्क लावलेले नाहीत तर ठोस वैज्ञानिक कारणे आहेत. पावसाळ्यात छोटे छोटे विषाणू आणि जंतू जे आपल्याला डोळ्यांना दिसतही नाहीत ते उघड्यावर ठेवल्या जाणाऱ्या पालकाला चिकटून राहू शकतात. कधी कधी उत्पादक सुद्धा पालकाला या किटाणू आणि जंतूंपासून निर्जंतुक करण्यासाठी त्यावर हानिकारक कीटकनाशकाचा वापर करतात. साहजिकच तुम्ही अशी पालक खाल्लीत तर शरीराला मोठे नुकसान होऊ शकते.

वांगी – अनेक ठिकाणी वांगे हे श्रावण महिन्यात भगवान शंकराला प्रसाद म्हणून चढवतात. पावसाळ्यात अनेक जण याची भजी खाणे पसंत करतात पण मुळात पावसाळ्यात वांग्यापासून लांबच राहावे. पावसाळ्यात वांग्यात अनेक छोटे छोटे किडे पडायला सुरुवात होते. हे किडे पोटदुखी आणि अनेक समस्यांना आमंत्रण देऊ शकतात. म्हणूनच जाणकार सुद्धा सांगतात की वांगे कापल्यावर त्यात थोडा जरी रंगाचं फरक दिसला किंवा डाग दिसला तर ते वांगे पावसाळ्यात खाऊ नये. शक्य असल्यास पावसाला संपेपर्यंत वांगे खाणेच टाळावे.

दूध – तुम्हाला माहित आहेच की दूध हे शरीरासाठी खूप उपयोगी आहे आणि हे दूध अनेक समस्यांपासून शरीराला सुरक्षा कवच सुद्धा प्रदान करते. मात्र पावसाळ्यात हे दूध न पिण्याचा सल्ला अनेक जण देतात. यामागे विविध कारणे सांगितली जातात. त्यापैकी प्रमुख कारण म्हणजे पावसाळ्यात दुधदुभत्या जनावरांना दिला जाणारा चारा आणि किटाणू आणि जंतूंचे घर असतो. हे जंतू आणि विषाणू चांगल्या गुणवत्तेच्या दुधाला सुद्धा खराब करू शकतात. म्हणून सहसा पावसाळ्यात दुधाचे सेवन टाळावे आणि दुध प्यायचेच झाल्यास ते खूप उकळून मग थंड करूनच प्यावे.

तळलेले आणि रस्त्यावरचे पदार्थ – तळलेले आणि रस्त्यावरचे उघडे पदार्थ पावसाळ्यात खाणे टाळावेत हे तर आपण शाळेपासून ऐकत आलोय आणि आपण या गोष्टीचे पालन केलेच पाहिजे कारण पावसाळ्यात डास, मच्छर, जंतू, विषाणू, किटाणू यांचा सुळसुळाट असतो. हे जंतू खाण्यासोबत तुमच्या पोटात जाऊ शकतात. उदाहरणार्थ आपण पाणीपुरीकडे पाहूया. पाणीपुरी मध्ये वापरलेले पाणी खराब असल्यास तुम्हाला अतिसार, डायरिया सारखे भयंकर आजार होऊ शकतात. त्यामुळे पावसाळ्यात या पदार्थांपासून लांबच राहावे.

मांस आणि मासे – मांस आणि माशांचे सेवन सुद्धा पावसाळ्यात न करण्याचा सल्ला दिला जातो. श्रावण महिन्यात आपण जो उपवास करतो त्यामागचे मुख्य कारण हेच आहे. आपण धार्मिक कारणाने उपवास करतो पण त्यामागचे शास्त्रातील तर्कशुद्ध कारण हेच आहे की या काळात पावसाळा असतो आणि मांस व मच्छी दोन्हींवर विषाणू आणि जंतूंचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत असतो. म्हणून अशा दुषित मांस व मच्छीचे सेवन करणे हानिकारक ठरू शकते. त्यामुळे पावसाळ्यात मांसाहार पूर्णपणे टाळावा. तर मंडळी आता पावसाळा सुरु झाला आहे. त्यामुळे ही अमुल्य माहिती आपल्या मित्रमंडळी व नातेवाईकांपर्यंत पोहोचवा आणि त्यांनाही निरोगी राहण्याचा सल्ला द्या.

हेयर एक्स्टेन्शन काय आहे, कसे वापरतात जाणून घ्या



हेयर एक्स्टेन्शन म्हणजे केसांची अशी एक्सेसरी आहे, ज्यामुळे आपण आपल्या लहान असलेल्या केसांना सोप्या पद्धतीने कोणतेही विग न वापरता अधीक लांब आणि दाट दाखवू शकता. केसांना लांब दाखविण्यासाठी पातळ एक्स्टेंशनला मानेच्या जवळ केसांमध्ये जोडलं जातं, ज्यामुळे केस खालून लांब आणि दाट दिसतात. हेयर एक्स्टेन्शन दोन रूपात असतात. नैसर्गिक आणि कृत्रिम दोन्हीमध्ये आढळू शकतं. कृत्रिम किंवा सिंथेटिक एक्स्टेन्शन ही क्लिपऑन असतात, हे लावायला सोपे असतात. हे बऱ्याच शेड्स मध्ये आढळतात. जसे की लाल, निळे, पिवळे, तपकिरी, गुलाबी इत्यादी. तसेच नैसर्गिक हेयर एक्स्टेन्शन हे वास्तविक केसांवर प्रक्रिया करून तयार केले जाते.

हेयर एक्स्टेंशन कसे असतात –

- क्लिपऑन एक्स्टेंशन – हे तात्पुरते एक्स्टेंशन असतात, जे एखाद्या खास पार्टीसाठी आपण वापरू शकता. क्लिपऑन एक्सटेन्शनला एका क्लिपच्या साहाय्याने केसांना जोडतात. पार्टी संपल्यावर आपण याला सहजपणे काढू शकता हे सर्वात सोपे असे एक्स्टेन्शन आहेत ज्याला आपण सहजपणे काढू किंवा घालू शकता.
- लाँग टर्म एक्स्टेन्शन – हे ४ ते ६ महिने चालतात. हे लावण्यासाठी केरॉटिन बॉण्ड वापरण्यात येत. बनावटी केसांच्या टिपाला केरॉटिन लावतात, ज्याला गरम रॉडने वितळवून खऱ्या केसांना जोडतात.
- टेम्पररी ग्लूऑन एक्स्टेन्शन – हे एक आठवड्यासाठी टिकून राहतात. टाळूला लिक्विड ग्लू लावून एक्स्टेन्शन चिटकवून देतात. याना काढण्यासाठी तेलबेस सॉल्व्हन्ट वापरले जातात.

काही खबरदाऱ्या घ्यावयाचा असतात–

- नैसर्गिक हेयर एक्स्टेन्शनची काळजी तशीच घ्यावी ज्याप्रमाणे आपण आपल्या नैसर्गिक केसांची घेता.
- आपले नैसर्गिक केस किमान ४ इंच लांब असायला हवे, तेव्हाच त्यामध्ये एक्स्टेन्शन लावता येऊ शकत.
- एकाच वेळी कमीतकमी २ एक्स्टेन्शन आणि जास्तीत जास्त १० ते १५ एक्स्टेन्शन लावता येऊ शकतं.
- हेयर एक्स्टेन्शन धुताना डोकं स्थिर ठेवावं आणि सल्फेट नसलेला मॉइश्चराइजिंग शॅम्पू वापरावं.
- केसांना लहानलहान भागात विभागून चांगल्या प्रकारे कोरडे करावे.
- एक्स्टेन्शन जास्त काळ ठेवू इच्छित असल्यास, त्यांना जास्त काळ ओले ठेऊ नका.

वजन झपाट्याने कमी करायचं असेल तर ट्राय करा आईस-टी



वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाया लोकांसाठी अगोड आणि बफार्चा चहा फायदेशीर आहे. उच्च रक्तदाब आणि हृदयाच्या इतर समस्यांनी ग्रस्त असलेल्या लठ्ठ लोकांसाठी देखील हे चांगले असू शकते.

- 1 लिटर पाणी सॉसपॅनमध्ये उकळवा आणि गॅसवरून काढून टाका
- गरम पाण्यात ४ चहाच्या पिशव्या, साखर (वापरत असल्यास) आणि लिंबाचे तुकडे टाका आणि ५ मिनिटे भिजू द्या.
- चहाच्या पिशव्या आणि लिंबाचे तुकडे गरम पाण्यातून काढून टाका
- खोलीच्या तापमानात थंड करा आणि नंतर चिल्ड होईपर्यंत रेफ्रिजरेट करा
- लेमन टी सर्व्ह करण्यासाठी ग्लासेसमध्ये बर्फ आणि लिंबाचे तुकडे भरा
- थंडगार चहा घाला आणि पुदिन्याच्या पानाने सजवा
- आईस-टी फ्रिजमध्ये ३ ते ४ दिवस चांगला ठेवतो

गोभी मसाला



साहित्य : २०० ग्राम कॉलीफ्लॉवरचे तुरे, २ टेस्पून तेल, ३ हिरव्या मिरच्या, १/२ टिस्पून हळद, १ टेस्पून आलेलसूण पेस्ट, ३/४ कप कांदा, बारीक चिरून (१ मध्यम), १ कप टोमॅटो, बारीक चिरून (२ मध्यम), ३/४ कप दही, १ टिस्पून धणेपूड, १ टिस्पून जिरेपूड, चवीपुरते मिठ, १ टेस्पून कसूरी मेथी, कोथिंबीर सजावटीसाठी, तेल, कॉलीफ्लॉवरचे तुरे तळण्यासाठी

कृती : कॉलीफ्लॉवरचे तुरे पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावेत. पाणी पाघळून घ्यावे आणि पेपर टॉवेलने अधिकचे पाणी टिपून घ्यावे. तळणीसाठी तेल तापत ठेवावे. त्यात मध्यम आचेवर कॉलीफ्लॉवरचे तुरे गोल्डन ब्राऊन रंगावर तळून घ्यावे. एका पॅनमध्ये २ टेस्पून तेल गरम करावे. त्यात हळद आणि आलेलसूण पेस्ट घालून ३० सेकंद परतावे. नंतर हिरव्या मिरच्या आणि चिरलेला कांदा घालून कांदा शिजेस्तोवर परतावे. कांदा निट परतला गेला कि त्यात चिरलेले टोमॅटो घालून, टोमॅटो मऊ होईस्तोवर शिजवावेत. नंतर धणे-जिरेपूड घालून मिक्स करावे. लगेच तळलेले कॉलीफ्लॉवरचे तुरे घालून हलक्या हाताने मिक्स करावे. गॅस मंद आचेवर ठेवावा आणि दही घालून मिक्स करावे. चवीपुरते मिठ घालावे आणि गरजेनुसार थोडे पाणी घालून ढवळावे. मंद आचेवर ३ ते ४ मिनीटे शिजू द्यावे. कसूरी मेथी चुरून पावडर करून घ्यावी आणि भाजीत घालावी. मिक्स करून मंद आचेवर पॅनवर झाकण ठेवून काही मिनीटे वाफ काढावी. कोथिंबीरीने सजवून पोळी, रोटी किंवा नानबरोबर सर्व्ह करावे.

पावसाळ्यात भाज्याफळे विकत घेताना करू नका 'या' चुका



पावसाळ्यात आरोग्य जपणं अत्यंत गरजेचं आहे. पण, ते एका दिवसाचं काम नाही. त्यासाठी तुम्हाला स्वतःच्या आहारापासून दैनंदिन सवयींपर्यंत अनेक बदल करावे लागतील. गरज पडल्यास तुमच्या आवडत्या पदार्थांना आहारातून वर्ज्य करावं लागू शकतं. एवढंच नाही तर फळं, भाज्या, धान्य घरी आणल्यानंतर ते व्यवस्थित स्वच्छ करून साठवण्याची आणि शिजवण्याची पद्धत इथपासून काळजी घेणं आवश्यक आहे. आरोग्य जपण्यासाठी कोणत्या सवयी बदलायला हव्या, याविषयी

फळं आणि भाज्या धुताना

पाच लीटर पाण्यामध्ये १०० ग्रॅम मीठ किंवा चिंच घाला. त्यात तीस ते चाळीस मिनिटं भाज्या आणि दहा ते पंधरा मिनिटं फळं बुडवून ठेवा. कोथिंबीर, कढीपत्ता दहा ते पंधरा मिनिटांपेक्षा जास्त काळ पाण्यात ठेवू नका. पाण्यातून काढल्यानंतर भाज्यांना थेट उन्हात न ठेवता त्यांना पंख्याखाली हळूहळू वाळू द्या. जमिनीवर चटई अथवा स्वच्छ चादर पसरवून त्यावर भाज्या आणि फळं ठेवा. वीस ते पंचवीस मिनिटं वाळवल्यानंतर पॅक करून फ्रिजमध्ये ठेवा.

कापडी पिशव्यांचा वापर

भाज्या नेहमी सुती किंवा कापडी पिशव्यांमध्ये आणाव्यात. कारण भाज्या आणि फळं बाजारातून घरी आणल्यानंतर कापडी पिशवी सकट धुवू शकतो.

खरेदी करताना कच्ची फळं आणि भाज्या खरेदी करण्यास प्राधान्य द्या. फळांच्या बाबतीत ही टीप अत्यंत महत्त्वाची आहे. अर्धवट पिकलेली फळं जास्त काळ टिकतात.

खरेदी करताना हे लक्षात ठेवा

केळं आणि पपई अर्धी कच्ची विकत घेतल्यानं पुढल्या दोन ते तीन दिवस ते आरामात टिकू शकतात. फळं जर पिकलेली असतील तर त्याच दिवशी खा. केळी आणि पपई कच्ची असल्यास दोन ते तीन दिवसानंतर तुम्ही खाऊ शकता. लक्षात ठेवा अर्धी कच्ची फळं फ्रिजमध्ये न ठेवता त्यांना बाहेर ठेवा; जेणेकरून ते व्यवस्थित पिकतील.

आहाराबाबतच्या टिप्स

आहार आणि रोगप्रतिकारक शक्ती या दोघांमध्ये घनिष्ट संबंध आहे. या दिवसात जितकं घरातील अन्न खाल तितकं तुमच्या आरोग्यासाठी उत्तम ठरेल. आहारामध्ये पोषणयुक्त पदार्थांचा समावेश असू द्या. पचनास हलका आहार घ्या. तेलकट, मैद्यापासून बनवलेले पदार्थ, पॅटिस यासारखे पदार्थ आहारातून वर्ज्य करा. शरीराला आवश्यक असणाऱ्या पदार्थांचं जसं कि, कडधान्य, पोळी, फळं, भाज्या, कोशिंबीर सेवन करा; जेणेकरून तुमची प्रतिकारशक्ती वाढेल.

पचनक्रिया

योग्य आहार घेतल्यानं पचनशक्ती सुरळीत पार पाडण्यास मदत होते. मजबूत पचनशक्ती तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करेल. जेवणासोबत दही खा. फायबरचं प्रमाण जास्त असणारी फळं (पपई, संत्री) खा. यामुळे पचनक्रिया सुरळीत पार पडेल. गरम पाण्यात थोडं आलं घालून त्याचं दिवसभरात थोड्या-थोड्या प्रमाणात सेवन करत राहा.

जंकफूड खाणे टाळा

संत्री आणि पेरू यांची गणना शरीराला भरपूर प्रमाणात 'क' जीवनसत्व मिळवून देणाऱ्या फळांमध्ये केली जाते. त्यांचं सेवन केल्यास तुम्हाला औषधातून 'क' जीवनसत्व घेण्याची गरज भासणार नाही. शीतपेयं आणि आईस्क्रीम खाणं टाळा.

फिट राहणं महत्त्वाचं

फिट राहण्यासाठी दररोज जिमला जायलाच हवं असा काही नियम नाही. घरच्याघरी देखील तुम्ही योग किंवा व्यायाम करू शकता. योग केल्यानंतर ३५ ते ४५ मिनिटं व्यायाम केल्यास तुमच्या पोटाचा वाढलेला घेर कमी करण्यास मदत होईल. शिवाय तुमची शरीरयष्टीही उत्तम राहील.

वॉर्मअप महत्वाचा

कोणताही व्यायामप्रकार करण्याआधी वॉर्मअप करणं आवश्यक आहे. वॉर्मअप केल्यानं शरीर व्यायामासाठी तयार होतं. तसंच स्नायूंवर अचानक ताणही येत नाही.

मंडळी पावसाळा आलाय, डेंग्यूचे प्रकार, लक्षणे आणि उपाय जाणून घ्या!



पावसाळ्यात पसरणाऱ्या साथीच्या रोगांपैकी डेंग्यूचा ताप हा सर्वात धोकादायक आणि जीवघेणा आजार मानला जातो. याचं सर्वात मोठं कारण हे आहे की या तापात रुग्णाच्या शरीरातील पेशी खूपच मोठ्या प्रमाणात कमी होऊ लागतात. पेशी म्हणजेच प्लेटलेट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यात मोठ्या प्रमाणात मदत करतात. तसेच शरीरातून वाहणाऱ्या रक्ताच्या गुठळ्या बनवण्यास उपयुक्त असतात.जेणे करुन शरीरातून अधिक रक्त वाहून जाऊ नये. पण नेमकं याच महत्वाच्या पेशींवर डेंग्यूचा ताप घाला घालतो. जस जसं शरीरातून पेशींची संख्या कमी होत जाते तस तसा रुग्णाची अवस्था अधिकच बिकट होत जाते. यावर वेळेत उपचार मिळाले नाहीत तर वेळेप्रसंगी रुग्ण दगावू देखील शकतो.

कसा होतो डेंग्यूचा प्रसार

डेंग्यू हा एक प्रकारचा व्हायरल ताप असतो. डेंग्यू हा मच्छर चावल्याने होतो. डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या मच्छरांचे बायोलॉजिकल नाव एडीज एजिप्टी असे आहे. सामान्य भाषेत या मच्छरांना टायगर मच्छर असंही म्हटलं जातं. कारण त्यांच्या शरीरावर सफेद आणि काळ्या रेषा असतात. या एडीज मच्छरांची एक खास गोष्ट ही आहे की ते घरातील साफ पाण्यात जन्म घेतात आणि त्यातच अंडीही घालतात. जसं की कूलरमध्ये साठलेलं पाणी, कुंड्यांमध्ये साचलेलं पाणी किंवा पाण्याच्या टाकीत ते जन्मास येतात. साधारणतः हे मच्छर सकाळी आणि दिवसभरात कधीही चावतात.

डेंग्यूचा प्रसार होण्यावा ऋतू

डेंग्यूचा प्रसार हा पावसाळा सुरु होताच म्हणजे जून महिन्याच्या शेवटच्या दिवसांपासून आक्टोबर महिन्यापर्यंत होतो. यानंतर हिवाळा सुरु होतो. त्यामुळे डेंग्यूच्या मच्छरांच्या जन्मास हा ऋतू सुयोग्य राहत नाही.

पण कधी कधी हे मच्छर आणि डेंग्यूचे रुग्ण बऱ्याच महिन्यांपर्यंतही आढळूनही येतात. पावसाळ्यात डबकी साचतात, पाणी तुंबते, सर्वत्र ओलावा असतो. त्यामुळे या अळ्यांना जन्मास एकदम अनुकूल वातावरण लाभते.

डेंग्यूची लक्षणे

डेंग्यूचा मच्छर चावल्यानंतर ३ ते ७ दिवसांदरम्यान डेंग्यूच्या तापाची लक्षणे दिसू लागतात. डेंग्यूचा मच्छर चावलेल्या रुग्णाला अचानकच खूप ताप येतो आणि भरपूर थंडी वाजून येते. रुग्णाचं डोकं प्रचंड प्रमाणात दुखू लागतं. तसेच सांध्यामध्ये होणाऱ्या वेदना आणि कमकूवतपणा सहन न झाल्याने अस्वस्थता येते. घशात कायम दुखणं सुरु असतं. हे कधी सौम्य तर कधी प्रचंड असतं. तसेच मानेवर, छातीवर आणि चेहऱ्यावर गुलाबी रंगाचे चट्टे येतात. यादरम्यान रुग्णाला काहीच खावसं वाटत नाही. सतत उलटीसारखं वाटत राहतं.

डेंग्यूचे प्रकार

डेंग्यूचा ताप सामान्यतः ३ प्रकारचा असतो. सामान्य डेंग्यू, रक्तस्त्राव डेंग्यू, डेंग्यू शॉक सिंड्रोम! या तिन्ही तापाची लक्षणं त्यांच्या प्रकारानुसार तीव्र होत जातात. वर सांगितलेली लक्षणं ही साधारण डेंग्यूची आहेत. दुसऱ्या प्रकारातील डेंग्यूमध्ये म्हणजेच रक्तस्त्राव डेंग्यूमध्ये रुग्णाची त्वचा पिवळी पडत जाते. सोबतच त्याचं अंग गरम ऐवजी थंड भासू लागतं. रुग्णाच्या नाकातून किंवा हिरड्यांमधून रक्त येऊ लागतं. यादरम्यान रक्ताच्या उलट्याही होऊ शकतात. प्लेटलेट्स कमी होऊ लागल्याने रुग्णाला खूप तहान लागते, घसा सुखतो आणि श्वास घेण्यास अडथळा येतो. तसेच तिसऱ्या प्रकारच्या म्हणजेच शॉक सिंड्रोम डेंग्यूमध्ये रुग्णाच्या नसा कमजोर होतात. प्रचंड पोटदुखी होते. अंग थंड पडून दुखण्याने रुग्ण तडफडू लागतो.

डेंग्यूमध्ये काय करु नये?

हा एक वायरल ताप आहे म्हणून त्यादरम्यान पॅरासिटामॉल, आयबुप्रोफेन आणि एस्प्रिनसारख्या औषधांचे सेवन करु नका. कारण डेंग्यूत अँटीबायोटिक गोळ्यांचा काहीही परिणाम होत नाही. जितकं देता येईल तितकं रुग्णाला ओआरएस पावडरचं पाणी देत राहा. भूक लागो अथवा न लागो पण जेवणाच्या वेळी रुग्णाला साल असलेल्या मुग डाळीची खिचडी द्या. रुग्णाने अजिबात भूक दाबून ठेवू नये नाहीतर गंभीर परिणाम होऊ शकतात. डेंग्यूचा मच्छर चावल्यानंतर ३ ते ७ दिवसांदरम्यान डेंग्यूच्या तापाची लक्षणे दिसू लागतात.

संमोहन करण्याचे १२ फायदे जाणून घ्या



एक तरुणी संमोहन असण्याच्या गाढ अवस्थेत संमोहन करणाऱ्याच्या समोर बसली होती. संमोहन करणारा तिला हळू हळू सूचना देत होता. त्याने तिला एका पेन्सिलीच्या टोकावर रबर लावून म्हटले की हे ठिणगी प्रमाणे तापत आहे. हे लाल आहे. नंतर त्या तरुणाने त्या तरुणीच्या बाजूला ती पेन्सिल टोचली. ती तरुणी जोरात ओरडली आणि बघता बघता त्या ठिकाणी फोड देखील आला. संमोहनाच्या या प्रयोगाने समजते की आपल्या मनाच्या सामथ्यार्नेच हे जग आणि आपला जीव नियंत्रित आहे. या एका उदाहरणाने समजते की कल्पना,विचार आणि भाव किती महत्वाचे आहे. या प्रयोगांनी असा निष्कर्ष निघतो की मानसिक उत्तेजनेमुळे शारीरिक बदल होतात. अशा परिस्थितीत संमोहनाचे हे फायदे होऊ शकतात.

१.कोणताही शारीरिक रोग काही प्रमाणात बरा होऊ शकतो.
२.कोणताही मानसिक आजार बराच प्रमाणात बरा होतो.
३.याद्वारे कोणत्याही प्रकारची भीती किंवा फोबिया दूर केला जाऊ शकतो.
४.याद्वारे व्यक्तीचा विकास करून यश मिळवता येते.
५.संमोहनामुळे दूर बसलेल्या व्यक्तीची स्थिती जाणून घेता येते.
६.या द्वारे शरीरातून बाहेर पडून फिरता येऊ शकतं.
७.या द्वारे भूत, भविष्य आणि वर्तमान काळाच्या घटनांना जाणून घेता येत.
८.या द्वारे आपल्या मागील जन्माला जाणून घेऊ शकतो.
९.याच्या माध्यमाने एखाद्याचे जीव वाचवू शकतो.
१०.याच्या माध्यमाने लोकांचे दुःख दूर करून त्यांची वेदना कमी केली जाऊ शकते.
११.याच्या माध्यमाने स्वतःच्या वाईट सवयी दूर केल्या जाऊ शकतात.
१२.याच्या माध्यमाने आत्मविश्वास आणि निर्भयता मिळवू शकतो.

या हिरव्या भाज्या खाणे पावसाळ्यात टाळा नाही तर आरोग्याला धोका



पावसाळा प्रत्येकाला आवडतो आणि या दिवसात काहीतरी मसालेदार आणि गरम खावेसे वाटते. परंतु आजकाल आरोग्याकडे सर्वाधिक लक्ष दिले जाते कारण पावसाळ्याच्या दिवसात दूषित अन्न आणि पिण्याचे पाणी सेवन केल्याने आजारी पडण्याचा आणि संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो.चला जाणून घेऊ या या दिवसात हिरव्या भाज्या का खाऊ नयेत–

१. सलाडच्या स्वरूपात कोबीचा वापर जास्त केला जातो, पण जर जास्त थर असतील तर आतमध्ये बारीक कीटक असतात. अशावेळी अन्नातील जंत तुमच्या शरीरात प्रवेश करतात आणि तुम्ही आजारीही पडू शकता. यामुळे पावसाळ्यात पालेभाज्या खाऊ नयेत.

२. टोमॅटोमध्ये काही क्षारीय घटक असतात, ज्यांना वैज्ञानिक भाषेत अल्कलॉइड्स म्हणतात, जे एक प्रकारचे विषारी रसायन आहे आणि ते किटकांपासून झाडाचे संरक्षण करण्यासाठी वापरले जाते. अशा परिस्थितीत पावसाळ्यात टोमॅटोचे जास्त सेवन केल्यास त्वचेशी संबंधित आजार होऊ शकतात. त्यामुळे पावसाळ्यात टोमॅटोचे सेवन टाळावे.

३. गरमागरम वांग्याचं भरीत पावसाळ्यात आणखीनच स्वादिष्ट लागतो, पण तुम्हाला माहीत आहे का की पावसाळ्यात फळे आणि फुले येताच त्यामध्ये किडे येऊ लागतात. कीटक झाडांवर अशा प्रकारे हल्ला करतात की 70 टक्के वांग्याचा नाश होतो. त्यामुळे पावसात वांगी खाणे टाळावे.

४. पावसाळ्याच्या दिवसात पालक नक्कीच हिरवा होतो, पण यावेळी पालकाच्या भाजीवर खूप बारीक किडे असतात त्यामुळे या दिवसात पालकाचे सेवन करू नये.

५. मशरूमच्या वेगवेगळ्या प्रजाती असतात, काही विषारी आणि काही खाण्यायोग्य. अशा परिस्थितीत खाण्यायोग्य मशरूम देखील शरीरासाठी हानिकारक असू शकतात, कारण मशरूम प्रदूषित ठिकाणी आणि वातावरणात उगवतात. त्यामुळे पावसाळ्यात मशरूमच्या खाण्या-पिण्यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात आरोग्याची काळजी घ्या.

अस्वीकरण : औषध, आरोग्य टिप्स, योग, धर्म, ज्योतिष इत्यादी विषयांवर वेब जगतात प्रकाशित/प्रसारण केलेले व्हिडिओ, लेख आणि बातम्या फक्त तुमच्या माहितीसाठी आहेत. या संबंधी कोणताही प्रयोग करण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्या.

२,८०० कोटींच्या टीडीआर घोटाळ्याचा संशय

ठाणे मनपातील 'गुप्त तडजोडी'वर अभिजीत पवारांचा हल्लाबोल

सुमारे २,८०० कोटी मूल्याच्या टीडीआर (हस्तांतरणीय विकास हक्क) प्रकरणात ठाणे महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात केलेल्या कथित तडजोडीवरून राजकीय वर्तुळात मोठा वाद निर्माण झाला आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सुमारे २,८०० कोटी मूल्याच्या टीडीआर (हस्तांतरणीय विकास हक्क) प्रकरणात ठाणे महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात केलेल्या कथित तडजोडीवरून राजकीय वर्तुळात मोठा वाद निर्माण झाला आहे. राष्ट्रवादी (शप) चे गटनेते अभिजीत पवार यांनी या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेत महापालिका प्रशासनाला थेट लक्ष्य केले असून, 'सभागृहाला अंधारात ठेवून एवढ्या मोठ्या आर्थिक हितसंबंधाच्या प्रकरणात तडजोड कोणी आणि कोणाच्या आदेशाने केली?' असा जाब विचारला आहे.

महापौरांकडे दिलेल्या लक्षवेधी सूचनेत पवार यांनी दावा केला आहे की, डी. दह्याभाई अँड कंपनी प्रा. लि. यांना पार्क आरक्षण क्र. ४ मधील ४ लाख चौरस मीटरहून अधिक क्षेत्राच्या मोबदल्यात टीडीआर देण्यासंदर्भातील प्रकरणात महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका अचानक तडजोडीद्वारे निकाली काढली. विशेष म्हणजे यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली होती. त्यामुळे महापालिकेची बाजू मजबूत असताना अचानक माघार का घेण्यात आली, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

पवार यांनी आरोप केला की, महाराष्ट्र महानगरपालिका



अधिनियमातील कलम ४८१ नुसार अशा तडजोडीसाठी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असते. स्थायी समिती अस्तित्वात नसल्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे. मात्र, एवढ्या महत्त्वाच्या निर्णयासाठी कोणतीही मंजुरी घेतल्याचा ठोस पुरावा प्रशासनाकडे नाही. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला.

ही अस्थिरता अराजकतेकडे नेऊ शकते?

'ठाणेकरांच्या मालकीच्या सार्वजनिक संपत्तीशी संबंधित हजारो कोटी रुपयांचा विषय असताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले गेले नाही. सभागृहाला डावलून काही अधिकाऱ्यांनी परस्पर निर्णय घेतला असेल तर हा लोकशाही व्यवस्थेचा अवमान आहे,' अशी टीका पवार यांनी केली. या प्रकरणामुळे शहराच्या विकास आराखड्यावर, पायाभूत सुविधांवर आणि पर्यावरणावर दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेले प्रतिज्ञापत्र कोणाच्या आदेशाने दाखल करण्यात आले, तडजोडीचा निर्णय कोणी घेतला आणि त्यासाठी कायदेशीर मंजुरी घेतली होती का, याची माहिती सभागृहासमोर तातडीने मांडावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच, जर कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करून तडजोड करण्यात आली असेल तर सर्वोच्च न्यायालयात याचिका पुन्हा पुनर्जीवित करण्यासाठी महापालिका अर्ज करणार का, याबाबतही प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी पवार यांनी केली.

सर्वसाधारण सभेत खडाजंगी होणार

या लक्षवेधी सूचनेमुळे सर्वसाधारण सभेत टीडीआर प्रकरणावर जोरदार खडाजंगी होण्याची चिन्हे असून, महापालिका प्रशासनाला कठोर प्रश्नांचा सामना करावा लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. २,८०० कोटींच्या व्यवहारामागील सत्य बाहेर आलेच पाहिजे,' असा इशाराही पवार यांनी दिला आहे.

एचपीव्ही लसीकरणामुळे गर्भाशय कर्करोगावर नियंत्रण

केईएम रुग्णालयात २८२ लाभार्थ्यांना एचपीव्हीची मात्रा

एचपीव्हीमुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, गुदद्वार, पुरुष जननेंद्रिय, योनी व घशाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. परंतु एचपीव्ही लसीकरणामुळे गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. केईएम रुग्णालयात एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २८२ लाभार्थ्यांना एचपीव्ही लसीकरणाची मात्रा देण्यात आली.



■मुंबई। प्रतिनिधी,

एचपीव्हीमुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, गुदद्वार, पुरुष जननेंद्रिय, योनी व घशाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. परंतु एचपीव्ही लसीकरणामुळे गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. केईएम रुग्णालयात एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २८२ लाभार्थ्यांना एचपीव्ही लसीकरणाची मात्रा देण्यात आली.

एचपीव्ही लसीकरण जनजागृती मोहिमेद्वारे कर्करोगांचा भार कमी करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे, असे केईएम रुग्णालयाचे मार्ड संघटनेचे अध्यक्ष डॉ. शुभम सोळंके यांनी सांगितले.

केईएम मार्डतर्फे सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज व केईएम रुग्णालयात दुसरी एचपीव्ही लसीकरण मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात आली. ही मोहीम कम्युनिटी मेडिसिन, प्रसूती व स्त्रीरोग आणि भूलशास्त्र विभागांच्या सहकार्याने तसेच रोटरी क्लब ऑफ मुंबई मुलुंड ईस्ट यांच्या सहकार्याने पार पडली. या मोहिमेचा उद्देश एचपीव्ही संसर्गाबाबत जनजागृती करणे व गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तसेच इतर एचपीव्हीसंबंधित कर्करोगांच्या प्रतिबंधासाठी लसीकरणाची उपलब्धता वाढवणे हा होता. निवासी डॉक्टर, एमबीबीएस विद्यार्थी, ओटी, फिजिओथेरपी व नर्सिंग विद्यार्थी व निवासी, इंटर्न, स्टाफ नर्सेस व प्राध्यापक यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

एकूण २८२ लाभार्थ्यांना भारतातील स्वदेशी, जेंडर-न्यूट्रल, क्वाड्रिव्हॅलेंट एचपीव्ही लस देण्यात आली. यापैकी १३१ लाभार्थ्यांना पहिला डोस देण्यात आला, तर इतरांना वेळापत्रकानुसार पुढील डोस देण्यात आले. विशेष म्हणजे २४ पुरुष लाभार्थ्यांचा सहभाग नोंदवण्यात आला, ज्यामुळे एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व पुरुषांनाही आहे याबाबतची जागरूकता वाढताना दिसून आली.

ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत माध्यमिक शाळा

- क्रेस्टमॉंड इंटरनॅशनल स्कूल, योगीधाम, गौरीपाडा, कल्याण (पश्चिम)
- इवा वर्ल्ड स्कूल, आरटीओ कार्यालयाजवळ, कल्याण (पश्चिम)
- अनिरुद्ध हायरस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कुळगाव-बदलापूर, ता. अंबरनाथ
- तिसाई विद्यालय (माध्यमिक), अडिवली भाल, ता. अंबरनाथ
- श्री स्वामी समर्थ विद्यामंदिर (माध्यमिक), अडिलवली, ता. अंबरनाथ
- ओम साई इंग्लिश स्कूल (माध्यमिक), कल्याण
- कुंबरेश्वर महादेव स्कूल, बी. आर. नगर, दिवा
- न्यू मॉडर्न डिस्कव्हरी स्कूल, मुंब्रा डेची कॉलनी, दिवा

ठाणे जिल्ह्यातील ८ अनधिकृत माध्यमिक शाळांची यादी जाहीर



■ठाणे। प्रतिनिधी,

पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश केवळ शासनमान्य आणि अधिकृत शाळांमध्येच घ्यावा, असे आवाहन माध्यमिक शिक्षण विभागाने केले आहे. आवश्यक मान्यता आणि परवानगीशिवाय काही शाळा सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिक्षण विभागाने ही सूचना जारी केली आहे. शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा शाळांमध्ये शिकर्णाया विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी, वर्ग मान्यता, परीक्षा पात्रता आणि पुढील प्रवेश प्रक्रियेत गंभीर अडचणी निर्माण होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अनधिकृत शाळांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित संस्थांविरोधात नियमानुसार कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पालकांनी कोणत्याही शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची शासनमान्यता, यू-डायस नोंदणी आणि इतर आवश्यक परवानग्यांची खातरजमा करावी, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

शाळांची निवड करताना केवळ आकर्षक जाहिराती, सुविधा किंवा विविध दाव्यांवर विश्वास न ठेवता संबंधित शिक्षण विभाग, गटशिक्षणाधिकारी कार्यालय किंवा शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून माहितीची पडताळणी करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. शिक्षण विभागाने जिल्ह्यातील पालक, ग्रामपंचायती, शाळा व्यवस्थापन समित्या आणि नागरिकांना त्यांच्या परिसरात कोणतीही अनधिकृत शाळा कार्यरत असल्याचे आढळल्यास त्याची माहिती तात्काळ विभागाला देण्याचे आवाहन केले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यार्ला दर्जेदार आणि मान्यताप्राप्त शिक्षण मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी अनधिकृत शाळांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही माध्यमिक शिक्षण विभागाने दिला आहे.

एका तरुणीने मैत्रीस नकार दिला म्हणून 6 मैत्रिणींचा विनयभंग...

चाकूचा धाक दाखवत जबरदस्तीने गाडीत बसवून...

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक शहरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. एका तरुणीने मैत्री करण्यास नकार दिल्याच्या रागातून आरोपी तरुणाने तिच्यासह सहा मैत्रिणींना जबरदस्तीने गाडीत बसवून विनयभंग केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित प्रकरणात पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे.

मैत्री नाकारल्याचा राग अन् संतापजनक कृत्य

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि तिच्या सहा मैत्रिणी नांदूर जत्रा लिंक रोड परिसरातून जात असताना आरोपीने त्यांचा रस्ता अडवला. त्याने संबंधित तरुणीकडे मैत्रीची मागणी केली. मात्र तरुणीने स्पष्ट नकार दिल्यानंतर आरोपी संतापला. त्यानंतर त्याने सर्व मुलींना दबाव टाकत वाहनात बसण्यास भाग पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. एका साध्या नकारातून एवढे गंभीर प्रकरण घडल्याने समाजात चिंता व्यक्त होत आहे.

गाडीत जबरदस्ती, अश्लील वर्तन आणि दहशतीचे वातावरण

तक्रारीनुसार, आरोपीने मुलींना गाडीत बसवल्यानंतर वाहन भरधाव वेगाने चालवत त्यांना घाबरवण्याचा प्रयत्न केला. याचदरम्यान त्याने मुलींसोबत अश्लील वर्तन केल्याचा आरोप आहे. मुलींमध्ये भीती निर्माण व्हावी यासाठी त्याने वारंवार धमकावल्याचेही समोर आले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे पीडित मुली मानसिक धक्क्यात गेल्या असून त्यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला.

चाकूचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी

घटना आणखी गंभीर बनवणारी बाब म्हणजे आरोपीने मुलींना चाकूचा धाक दाखवला. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, त्याने जीवे मारण्याची धमकी देत मुलींमध्ये दहशत निर्माण केली. काही वेळानंतर मुली वाहनातून खाली उतरल्या, मात्र आरोपी त्यांचा पाठलाग करत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अशा घटना अत्यंत गंभीर मानल्या जात आहेत.

पोलिसांची तातडीची कारवाई... आरोपीला अटक

पीडित मुलींनी घडलेला प्रकार पोलिसांना सांगितल्यानंतर आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू करत आरोपीचा शोध घेतला आणि त्याला अटक केली. सध्या आरोपीची चौकशी सुरू असून घटनेमागील इतर पैलूंचाही तपास केला जात आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांबाबत तात्काळ तक्रार करण्याचे आवाहन केले आहे.



या घटनेनंतर नाशिकमध्ये महिलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. सार्वजनिक ठिकाणी तरुणींचा छळ, धमक्या आणि जबरदस्तीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. सामाजिक संघटना आणि नागरिकांनी अशा गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तज्ज्ञांच्या मते, महिलांनी कोणत्याही प्रकारच्या धमकी किंवा छळाची घटना लपवून न ठेवता त्वरित पोलिसांशी संपर्क साधणे आवश्यक आहे. समाजात सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि जनजागृती या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

मेंढवण खिंडीत पोलिसांचा सापळा... 28.04 लाखांचा प्रतिबंधित माल हस्तगत

■डहाणू। प्रतिनिधी,

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा, सुगंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थाच्या अवैध वाहतुकीविरोधात कासा पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल 28 लाख 4 हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकासह एका संशयितावरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

कासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 20 जून 2026 रोजी सकाळी सुमारे 10 वाजण्याच्या सुमारास गुजरातकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कारची अहमदाबाद-मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील मेंढवण खिंड परिसरात तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान वाहनामध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा,



केशरयुक्त पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. पोलिसांनी वाहनासह संपूर्ण माल जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये केशरयुक्त पानमसाला, इतर पानमसाला उत्पादने तसेच व्ही-1 तंबाखूचा समावेश असून त्याची एकूण किंमत 28 लाख 4 हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

या कारवाईत 3 लाख 84 हजार रुपयांचा पानमसाला, 3 लाख 48 हजार रुपयांचा अन्य केशरयुक्त पानमसाला, 72 हजार रुपयांची तंबाखू उत्पादने तसेच वाहन असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. हा माल गुजरातमधील वलसाड परिसरातून मुंबई व विरार भागात विक्रीसाठी नेला जात असल्याची प्राथमिक माहिती तपासात समोर आली आहे. या प्रकरणी कासा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 121/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता 2023 मधील विविध कलमांसह अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 आणि संबंधित नियमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अज्ञात चालक तसेच कल्पेश भोईर (रा. मांडवी, विरार) याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विभुते करीत असून प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या पुरवठा साखळीचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



भाईंदरमध्ये शाळेच्या बसला डंपरची धडक

भाईंदर :भाईंदरमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणाया एका बसला मागून येर्णाया डंपरने जोरदार धडक दिल्याची घटना मंगळवारी संध्याकाळी सहा वाजता घडली आहे. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र बसचे अपघातात मोठे नुकसान झाले आहे. भाईंदर पूर्वेच्या बाळासाहेब ठाकरे मैदानाजवळ भरधाव वेगाने जार्णाया एका माती वाहतूक करर्णाया डंपरने बसला मागून जोरदार धडक दिली आहे. यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, यात बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मिरा- भाईंदर शहरात बेकायदा माती भराव करणारे डंपर, रेडी मिक्सर सिमेंट काँक्रीट वाहतूक करर्णाया गाड्या या अत्यंत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने गाड्या चालवत आहेत. त्यातून बरेच अपघात होऊन नागरिकांना जीव गमवावा लागला आहे.

मालक बलात्काराच्या गुन्ह्यात जेलमध्ये, इकडे नोकराने मालकिणीसोबत...

■मुंबई। प्रतिनिधी,

आपल्या मालकाची मालमत्ता बळकावण्यासाठी एका नोकराने भयानक पाऊल उचलले. त्याने आपल्या मालकासह त्याची पत्नी आणि चार मुलांची अशी एकूण सहा जणांची हत्या केली. याप्रकरणी त्याला सुरुवातीला अटक झाली होती. मात्र काही काळासाठी तो अंतरिम जामीन मिळाल्यावर बाहरे आला आणि फरार झाला. त्याला आता अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. साहिब खान उर्फ बंटी (36) असे या आरोपी नोकराचे नाव आहे. या नराधमाने 2017 मध्ये वेगवेगळ्या वेळी या सहा हत्या केल्याचा आरोप आहे. दिल्लीतील ही घटना आहे.

मालक बलात्काराच्या प्रकरणात जेलमध्ये

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी साहिब खान 2014 मध्ये प्रॉपर्टी डीलर मुनव्वर खान याच्याकडे कामाला लागला होता आणि हळूहळू त्याने मुनव्वरचा विश्वास संपादन केला. 2016 मध्ये मुनव्वर एका बलात्काराच्या प्रकरणात जेलमध्ये गेल्यानंतर साहिबने त्याच्या मालमत्तेवर ताबा मिळवण्यासाठी संपूर्ण कुटुंबाचा काटा काढण्याची अत्यंत क्रूर आणि सुनियोजित कट रचला. त्याने पहिल्यांदा मुनव्वरची पत्नी आणि दोन मुलींना बलात्काराचा खटला मिटवण्याच्या बहाण्याने उत्तर प्रदेशातील मवाना येथे बोलावून घेतले, तिथे त्यांची गोळ्या झाडून हत्या केली आणि मृतदेह कालव्यात फेकून दिले. यानंतर त्याने मुनव्वरच्या दोन मुलांची दिल्लीत गळा आवळून हत्या केली आणि त्यांचे मृतदेह आधीच खोदून ठेवलेल्या खड्डयात गाडले. नंतर, जेव्हा मुनव्वर आपल्या बेपत्ता कुटुंबाचा शोध घेण्यासाठी अंतरीम जामिनावर तुरुंगातून बाहेर आला, तेव्हा आरोपीने त्याचीही गोळ्या झाडून हत्या केली.

बहिणीच्या लग्नासाठी बाहेर, पण...

हे संपूर्ण प्रकरण 2017 मध्ये पहिल्यांदा समोर आले होते, जेव्हा मुनव्वरची पत्नी आणि चार मुले बेपत्ता झाल्यानंतर अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी या संपूर्ण कुटुंबाचा खात्मा करण्याच्या छुप्या कटाचा पदार्फाश केला आणि साहिबला अटक केली. त्यावेळी चौकशी दरम्यान साहिबने सर्व सहा हत्यांची कबुली दिली होती, ज्यानंतर वेगवेगळ्या कलमांखाली गुन्हे नोंदवून त्याला आणि त्याच्या साथीदारांना तुरुंगात पाठवण्यात आले होते. मात्र, गेल्या वर्षी 14 ऑक्टोबर 2025 रोजी त्याला बहिणीच्या लग्नासाठी 15 दिवसांचा अंतरीम जामीन मंजूर झाला होता. जामिनाची मुदत संपल्यानंतर तो शरण आला नाही आणि फरार झाला. त्यामुळे या वर्षी 5 मे रोजी दिल्लीच्या एका न्यायालयाने त्याला घोषित गुन्हेगार ठरवले होते.

फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी

वेगवान न्यायालयामध्ये (फास्ट ट्रॅक कोर्ट) या हत्याकांडाची सुनावणी सुरू होती, मात्र आरोपी फरार झाल्यामुळे न्यायालयीन कामकाजात मोठा अडथळा निर्माण झाला होता. अखेर गुप्त माहिती आणि तांत्रिक देखरेखीच्या (टेक्निकल सर्व्हेलन्स) आधारे दिल्ली पोलिसांनी 14 जून रोजी साहिब खानला पुन्हा बेड्या ठोकल्या. ताज्या चौकशीत आरोपीने सांगितले की, तो पोलिसांपासून वाचण्यासाठी सतत आपली ठिकाणे बदलत होता आणि हरियाणातील सोनीपत येथे भाड्याच्या घरात राहत होता. तसेच मुनव्वर खानच्या मालमत्तांवर लक्ष ठेवण्यासाठी तो अधूनमधून लपून-छपून येत होता. या अटकेमुळे आता न्यायालयातील प्रलंबित खटल्याला गती मिळणार आहे.

12 वर्षाच्या लेकासमोर आईवरच लैंगिक अत्याचार, नंतर..

आईवर 12 वर्षाच्या लेकासमोर लैंगिक अत्याचार करण्यात आला. धक्कादायक बाब अशी की, गुन्हेगार चोरी करण्याच्या उद्देशाने घरात घुसले, परंतु नंतर त्यांनी माणुसकीच्या सर्व मयार्दा ओलांडल्या. पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला.

■मुंबई। प्रतिनिधी,

मध्य प्रदेशातील उज्जैन जिल्ह्यातून माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. आईवर 12 वर्षाच्या लेकासमोर लैंगिक अत्याचार करण्यात आला. धक्कादायक बाब अशी की, गुन्हेगार चोरी करण्याच्या उद्देशाने घरात घुसले, परंतु नंतर त्यांनी माणुसकीच्या सर्व मयार्दा ओलांडल्या. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला. ही घटना उज्जैन शहरापासून 65 किमी अंतरापासून बडनगर तहसील परिसरातील एका गावात घडली होती.

12 वर्षाच्या मुलासमोर आईवर लैंगिक अत्याचार

18 जून रोजी मध्यरात्री पाच जण पवनचक्कीची तार चोरण्याच्या उद्देशाने पीडित महिलेच्या घरात शिरले. तेव्हा पती पत्नी आणि त्यांचा 12 वर्षीय मुलगा गाढ झोपी गेला होता. झोपलेलं पाहूनच संबंधितांनी डाव साधत माणुकीला लाज आणणारे कृत्य केले.

गुन्हेगारांनी कुटुंबाला जागे केले आणि महिलेच्या पतीला जबरदस्ती बाहेर नेले, नंतर मारहाण केली आणि पवनचक्कीचा तारा देखील चोरल्या, याच घटनेदरम्यान पीडितेला मुलगा एका शेडमध्ये होता.

दरम्यान पीडितेनं केलेल्या जबाबानुसार, काही गुंड झोपडीत घुसले होते. नंतर महिलेला आणि तिच्या मुलाला जवळच्या झुडुपात नेत धमकावले, नंतर त्या चिमुरड्यासमोर महिलेवर लैंगिक अत्याचार केला. या घटनेनं मुलगा भयभीत झाला होता. पीडित महिला आणि मुलाने पोलिसांना सांगितलं की, हल्लेखोरांकडे शस्त्रे होती.

वडिलांना बंदुकीचा धाक दाखवून मारहाण

वडिलांना बंदुकीचा धाक दाखवून मारहाण केली आणि नंतर धमकावले. संबंधित प्रकरणात असा आरोप करण्यात आला. मात्र, पीडिता आणि तिच्या मुलाचा दावा असा की, तीन गुन्हेगारांनी सामूहिक लैंगिक अत्याचार केला होता. असातच पोलिसांनी गुन्हा दाखलव करून आरोपींचा शोध सुरू केला.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com